


# भिंतीशिवायच्या खिडकीतून डोकावताना

सचिन केतकर

# भिंतीशिवायच्या खिडकीतून डोकावताना

सचिन केतकर

अभिधानंतर प्रकाशन

भिंतीशिवायच्या खिडकीतून डोकावताना / सचिन केतकर

Bhintishivayachya Khidakitun Dokavatana / Sachin Ketkar

अभिधानंतरचा पाचवा कवितासंग्रह

© सचिन केतकर

पहिली आवृत्ती ¤ : डिसेंबर २००४

मुखपृष्ठ : संजीव खांडेकर

मूल्य : १०० रुपये

मुद्रक/प्रकाशक :
हेमंत दिवटे
अभिधानंतर प्रकाशन
१७०१/१७०२, ६ए-व्हीस्परिंग पामस्
लोखंडवाला टाऊनशिप
कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१
फोन : (०२२) ५६९२०३२०
E-mail : poetrywala@hotmail.com

मुद्रण स्थळ :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

आदरणीय
गणेश देवीसरांना
सप्रेम

## स्वगत एका अतिशहाण्या साबणाचं

मी एकेकाळीचा चांगला गलेलठ्ठ हिरवा सुगंधी गठ्ठा
आज फक्त अर्धपारदर्शक अर्धवट चकती होऊन
उर्वरीत आयुष्य घालवतोय
तुमच्या बाथरूमच्या फरशीशी एकजीव होऊन.
जन्मभर तुमच्यासाठी राबलो अंगाशी अंग घासलं
देह झिजवला. जिवाचा फेस केला.

मी तुमच्या देहावरच्या प्रत्येक केसाच्या मुळाशी परिचित आहे
तुमच्या जोडीदाराहून अधिक तुमच्या देहाला मी ओळखतो
प्रत्येक छिद्र प्रत्येक चढउतार प्रत्येक फट
माझ्या परिचयाची आहे
तुमच्या देहाचा संपूर्ण नकाशाच माझ्या मनात स्टोर केलेला आहे

जरी मला कोणीही वाळीत काढू शकत नाही
तरीही राहून साहून मी शुद्रातिशूद्र मळ काढणारा मजूरच
पण जरी मी उपेक्षित असलो तरीही
ओल्या फरशीचं सोंग करून बसलोय
तुमचा पाय पडण्याची वाट पाहात

◆

# त्वचा नावाची भानगड

(१)

खरं तर
मला ह्या त्वचा नावाच्या भानगडीचा
रागच येतो

सुरुवातीला कशी बोलावते
स्वत:च्या सर्व स्निग्ध मृगजळी ओठांना
अर्धवट उघडून

मग चक्क
तुझ्या आणि माझ्या
मधे तडमडते

(२)

उगीच नाही तिला
माणसाच्या शरीरातलं
सर्वात मोठं इंद्रिय म्हणतात

शरीराचा सर्वात जास्त रक्त प्रवाह
स्वत:कडे ओढते साली
वर प्रत्येक सालाची अचूक नोंद ठेवते
स्वत:च्या सालीवर

(३)

ज्याला आपण माणूस वगैरे म्हणतो
शेवटी त्वचाचकी.

कारण आपल्याला त्वचाच दिसते
डोळा नावाच्या त्वचेसमोर
ज्याला आपण कपडे म्हणतो
ही त्वचा कमी पडत असल्यामुळे
वापरात येणारी कृत्रिम त्वचाच.

(४)

ज्याला आपण जग की काय म्हणतो
हेही दैव नावाच्या थेरड्याचं
सैल सुरकुत्याग्रस्त कातडंच की काय
अशीही शंका येते

हा म्हातारा लुडकल्यावर
त्याचं कातडं आपण उतरवून घेऊ
व आपल्या बायकांसाठी
पर्स, सौंदर्य प्रसाधनं वगैरे बनवू.

(५)

सोल मला
बनव माझ्या चामडीतून
चपला.
तुडव माझ्या त्वचेला धुळीत

कारण आतापासून मी
उलटा केलेल्या शर्टासारखा
देह घालणार आहे

त्यामुळे तुम्ही पाहू शकाल सगळे
उलट्या झालेल्या हाडपिंजरात
बाहेर लोंबकळणारी आतडी,
बुळबुळीत यकृत, प्लीहा
किडण्या, जठर, उदर आणि मुख्य म्हणजे
फुफ्फुसामागे लपलेला
कंटाळवाणा थकलेला बूस्टर पंप.

# सेल्फ पोर्ट्रेट काढताना झालेले लोचे

दोन बंद पडलेली घड्याळं
माझ्या डोळ्यांच्या खाचांमधे
एकात दहा वाजून चौदा मिनिटं झाली आहेत
दुसऱ्यात चौदा वाजून दहा मिनिटं.

माझ्या मनगटावरच्या डोळ्यामधे पाहून
सांगतो तुम्हाला
किती टाईम उरलाय ते.

माझं तोंड म्हणजे भारतीय बैठकीतलं
संडासाचं पांढरं स्वच्छ कमोड
ज्यात दिसेल तुम्हाला
विश्वरूप दर्शन.

माझे कान कुलुपांची भोकं आहेत
ज्यात माझी बायको
विसरून गेलीय तिची किल्ली.

बाहेर माझ्या धुळकट चिंचोळीवर
हजारो रिकाम्या खिडक्या उगवल्यात
फ्रेम शिवायच्या.
ज्यात आहेत माझी
हजारो अदृश्य पोर्ट्रेटस्

ह्या खोलीचं चित्र काढतानाही
बरेच लोचे केलेत
सिलींग फॅनच्या जागी आहे
माझं मुंडकं

अन् मुंडक्याच्या जागी आहे
गरगरणारा पांढरा सिलींग फॅन.

उकडायला लागलं तर
सिलींगवरच्या मुंडक्याची
स्पीड वाढवून घ्या.

◆

## खाचांमधून उडून जाणारे डोळे

तुझ्या योनीसारख्या कोरड्या
माझ्या मनाच्या पापण्या

ज्यावर उरले आहेत फक्त
पांढरे खारट क्षार

माझ्या लिंगासारखं निरुत्साही
तुझं गारठलेलं काळीज

धरू दे कोपरापासून कापलेले
माझे हात ताटलीत तुझ्या पायाशी

गाऊ दे माझ्या छातीत दफनवलेल्या
जुन्या हेकट अमावास्या
व कुजत चाललेले चंद्र

अन् उडून जाऊ दे एकदाचे
माझे डोळे खाचांमधून

तुझ्या अवकाशात

◆

## मारुतीस्तोत्र

वांझ मरतुकडी मारुती
मर्ढेकरी रात्रीत पाहते
तिच्या रेताड स्वप्नांच्या
हार्डकोर साईट्स
पाचदहा एमबीच्या घाणेरड्या क्लिपस्

मरतुकड्या मारुतीच्या पांढऱ्याशुभ्र पाठीवर
चढते हपापलेली कामातुर सुमो भर रस्त्यात
हसणाऱ्या टायरांचे व यांत्रिक झटक्यांचे
अशक्य अँगल्सनी घेतलेले शॉटस्
किंवा
पाठीस पाठ लावून
अगतिक डोळ्यांनी आपल्याकडे पाहणाऱ्या दोन मारुती
एकाचं अगोचर इंद्रिय
दुसरीच्या सायलेन्सरमधे

तेवढ्यात मी कुठूनतरी येतो
आणि सण्ण करून दगड घालतो
ओंगळ मोटारीच्या पाठीत
त्या किंचाळून पळून जातात गल्लीबोळात
तसंच इंद्रिय इंद्रियात अडकलेलं घेऊन

म्हणूनच
दचकून उठते ती घामेजलेली मोटार
दिव्यांनी पंक्चरलेल्या रात्रीत
धपापत
पण
तिचा बदललेला नसतो
एकही गीयर

◆

## नादुरुस्त सूर्याला चालू करताना म्हणायचं स्तोत्र

मांसल गंजके स्पेरपार्ट
काळाच्या कबाडखान्यातून
मी उचलून आणतो
एका नादुरुस्त सूर्यासाठी
त्यात टाकतो
कालबाह्य ग्रीझ

त्याची नरकस्थ स्प्रिंग
कैलासवासी काटकोण
आणि वारलेली वारकरी घड्याळं
पुन्हा सुरू करण्याच्या प्रयत्नात पडतो
त्याच्या नादुरुस्त पिना
सडलेल्या सॉकेटमधे टाकून
त्याला रीचार्ज करण्याच्या फंदात पडतो

पण त्याचे अल्ट्राव्हायोलेट जांभळी डोळे
आकाशाकडे लागलेले असतात
वाघिणीच्या दुधाच्या पावडरीचं दूध पिऊन वाढलेल्या
स्क्रू-ड्रायव्हरची मी आराधना करतो
पण त्याच्या डीस्-इंटिग्रेटेड चिप्मधे
कसलाच संचार होत नाही

आता त्याचे दिवस भरलेत
ओसरलीयत त्याच्या आभासी ठुसठुसणाऱ्या
काळजाची यांत्रिक स्पंदनं

जेव्हा त्याचा थंड दहा मणांचा शिशाचा देह
शांत होईल तेव्हा
काहीच झालं नाही असं समजून
मिटा त्याचे
कार्बन डोळे

◆

# अलतामिरा

ट्रेनच्या घाणेरड्या संडासात
भिंतीवर कोरलेल्या नागड्या फर्टिलिटी गॉडेसची रेखाटनं

पायांमधल्या छिद्राकडे बाण दाखवून
तुमचा लंड इथं टाका असा निनावी संदेश
मी त्या मांसल पदरांमधल्या छिद्रावर माझा कर्झर नेतो
अन् क्लिक करतो

तर उघडते अलतामिराची अंधारलेली गुहा

ज्या गुहेतून आपण कधी बाहेरच पडू शकलो नाही
मी चकमकीवर चकमक घासून
पेटवतो पाचोळ्याची शेकोटी
त्यामुळे उजळतात
भिंतीवर कोरलेल्या केसाळ मॅमॉथच्या शिकारकथा
रुंद मांड्या व मोठ्या स्तनांच्या
सुपीक स्त्रिया
ह्या कथांमधे माझं चित्र नाही माझी कथा नाही
मी फक्त काळोखाची भूमिका वठवतो
ह्या न संपणाऱ्या डार्विनीयन आदिनाट्यात

मी माझ्या मनातल्या तुंबलेल्या संडासच्या भिंतीवर
अलतामिराची लिंक क्लिक करतो
ते फक्त पेज नॉट फाऊंड
ॲक्शन कॅन्सल्डचा कंटाळवाणा संदेश वाचण्यासाठी

सार्वजनिक शौचालयात
शीला रांड आहे
असा एक प्रागैतिहासिक शिलालेख आढळतो
कोणत्यातरी मादीमानवानं लिहून ठेवलेला

तर महाविद्यालयीन मुतारीत
ओनिडाच्या सैतानांनी
मॅमॉथच्या प्रचंड हस्तिदंतांनी
कोरून ठेवलाय आपल्यासाठी
एक इडीपल संदेश
नेबर्स एन्व्ही ओनर्स प्राइड

◆

## पाण्याने त्या दिवशी काय केले ते

गळलं
पाणी
टाकीतून
थेंब
थेंब
थेंब थेंब
थेंब
डोक्या
वर
टप
डोक्यावरूनकपाळावरकपाळावरून
भिवयांवरभिवयांवरून

घरंगळत

गालाकडे
वळलं गालावरून भरभर पळत

टप

टप

◆

# फेब्रुवारीत लिहिलेली एप्रिलवरची कविता

होरपळून निघालेल्या डांबरी रस्त्यावर
उताणा पडलाय
गर्भपात झालेला टामेटू
एका आकाशाला लावलंय
ट्रॅक्शन सलाइन
सूर्याच्या अणूभट्टी रुग्णालयात
जग पेटलंय बल्बातल्या फिलामेंटसारखं
उन्हाळ्याच्या विक्राळ राक्षसी अर्भकाला हवी आहे
आकाशातल्या पंख्याची
पेटलेली हवा
इमारतींच्या तळपायातून, खाकेतून सुटणारा
कुबट घाम
कळण्यापूर्वीच वाळतो
मागे सोडून जातो
क्षारग्रस्त पाऊलखुणा
हा आहे सर्व ऋतूंना संपवणारा ऋतू
सर्व ऋतू येण्याअगोदरच आलाय
पहिल्या महिन्यातल्या काही दिवसांतच
पडून जातात
वसंत ग्रीष्म वगैरे गर्भ
मी मे महिन्याचं क्रूसावर लटकणारं
धगधगीत जळतं मढं
घेऊन फिरतोय माझ्या पाठीवर
फेब्रुवारीपासूनच
◆

## आजकालची बिघडलेली शॉर्ट मेसेज सर्व्हिस

एक सकाळ
थकून उठते
जांभयांच्या विस्कटलेल्या
अंथरूणातून
अन् गाते
थकलेल्या आवाजात
थकव्याच्या चिंचोळीवरून
कष्टांने ंदटू करतो
तिच्या थकलेल्या आत्म्याला
श्वासनलिकेतून वाहतात
एकतीस काळवंडलेल्या डब्यांच्या
दमलेल्या मालगाड्या
अहोरात्र
तिच्या तापलेल्या पतऱ्याच्या हृदयातून
सिस्टीम रिसोर्सिस क्षीण असल्याचे संकेत
एक थकलेली
दुपार
झोपते मेल्यासारखी
चोळामोळा दमेकरी अंथरुणात
तिच्या उघड्या तोंडातून घरंगळतो
मृतलाळीचा थकलेला ओघळ
तिचा मेंदू डिफॅगमेन्ट होण्याच्या प्रयत्नात
दहादा रिस्टांट होतो

एक दमेकरी संध्याकाळ
हत्तीरोग झालेल्या पायांनी फरफटते
जांभयांच्या नगरांच्या
जड पापण्यांमागे
स्वत:च्या मनाला
खिश्यात वायब्रेटरमोडमधे ठेवून
एक ठुसठुसणारा काळोख
टचकन् उगवतो
माझ्या निष्पर्ण नागड्या बोटांवर
एकाद्या कडूजार काळ्या रानटी फळासारखा
अन् एक थकलेली कविता
येऊन पडते माझ्या थकलेल्या मेंदूत
अनोळखी इसमांनी पाठवलेल्या
भिकार एसएमएससारखी

◆

## काही अन्य परिसरांबद्दल

बरोबर ड्रॉइंगरूमच्या मधोमध
संडासाचं कमोड
भिंतीवर मिशा पिळत उभी
शिश्न असलेली नागडी बाई

शिश्नांच्या कोळिष्टकात
तडफडतीय एखाद्या रुग्ण माशीसारखी
योनी

लाकडी कपाटात लपलेल्या स्तनांवर
उगवलंय हिरवंगार गवत

मेलेल्या पाण्याची कामचुकार प्रेतं
भटकतात खुळ्या भिकाऱ्यागत
वाळूचे घोट पीत

तुम्ही तडिपार केलेल्या शब्दांचे डोमकावळे
इथे विष्ठेत नांदतात

तुमच्या सूक्ष्म संवेदनांचे कंप
इथे डुक्कर होऊन गटारीतून
बागडतात
ही गलिच्छ वस्ती
तुमच्याच नकाशांचा
फाटका भाग आहे.

या चक्कर मारायला इथं
अधूनमधून

◆

## फ्रूटसॅलड

ट्रेनमधे फळीवर ठेवलेल्या लाल कॅनव्हास बॅगेत
कलिंगडासारखं कापून माझं डोकं ठेवलंय
आणि आल्याच्या तुकड्यांसारखे
माझ्या बोटांचे तुकडे

आणि केळ्याच्या सालीत
गाजर
थोडंसं सोललेलं

◆

## स्पॅम

१

ॲटॅचमेन्टसबरोबर येतो
My doom व्हायरस
आपल्या प्रत्येक कोषाच्या नाभिकेत शिरून
प्रसवतो स्वत:च्या लक्षावधी प्रती क्षणार्धात
अंकित करीत स्वत:ची गिचमीड विध्वंसक लिपी
आपल्या जनुकीय संकेतप्रणालीत
कर्करोगासारखा पसरत
बारा वाजवतो आपल्या ऑपरेटींग सिस्टीमचे
अगतिक ठरतो
प्रतिकारासाठी
माझा नॉरटन प्रोटेक्टेड आत्मा
हुकवर तडफडणाऱ्या
म्यूटंट माशासारखा

२

आम्ही शब्दांचे पंख तुटलेले डिजिटल कावळे
चोचींनी कुरतडतोय
तुमच्या पवित्र गायींची
म्लेच्छ कातडी

आम्ही ई-टोळ
हजारो आय-डींवरून
स्पॅम करू अहर्निश
तुमच्या बुजगावणी जाणिवा
पाहू किती डीलिट करताय
आमचे विषाणूयुक्त संदेश

३

मी पोस्टमॉडर्न परिक्षित
माझ्यासमोर हे आभासी फळ
प्राक्तनात स्पॅम केलेलं

त्यात अनोळखी वर्म आहे माहीत आहे मला
अळीचा तक्षक होणार हेही माहीत आहे मला

पोटातूनच ज्ञान मिळालंय मला
की ह्या व्हर्च्युअल वर्ल्ड वाइड चक्रव्यूहातून
बाहेर पडायला मार्ग नसतो

म्हणूनच मी ह्या फळाचं आयकॉन क्लिक करतो
अन् वाट पाहतो

शेवटच्या दंशाची

४

बेडरूममधे बाजारहाट मांडून बसलाय
डिजीटल घटोत्कच
माझ्या संगणिकेतून ओरडतो

लिंगाची लांबी वाढवा
स्वस्त्यात वायग्रा घ्या
कमी व्याज दरात कर्ज घ्या
जाडी कमी करण्याचा सोपा उपाय
रशियन बायका झवा
दहा हजार डॉलरचा जॅकपॉट उचला
जुना आत्मा देऊन नवीन घ्या
माझ्या मनाचा मेलेला मेलबॉक्स
तुंबतो सार्वजनिक संडासासारखा
खरं म्हणजे मला
लिंगाची लांबी वाढवण्याची इच्छा आहेच

स्वस्त्यात वायग्राही मिळाला तर हवाच आहे
कमी व्याज दरात कर्जही हवंय
जाडी कमी करण्याचा सोपा उपायही शोधतोच आहे
रशियन बायकाही चालतील म्हणा
दहा हजार डॉलर्स मिळाले तर बरं होईल
आणि जुन्या आत्म्याच्या बदल्यात नवा मिळाला तर
भिकार हॉरर सिरीयलमधे भूताचं कामही मिळेल
पण मी हे सर्व मेल्स
उघडण्यापूर्वीच डिलीट करतो

मला माझा रिकामा व्हर्जिनल मेलबॉक्स
किती आवडतो

हाच निर्वाणीचा क्षण
हाच मोक्ष

५

खरं तर ह्या अगतिक निळ्या ग्रहावर
आपण चुकूनच येऊन पडलोय

आपल्याला कोणी
कोणाकडे पाठवलं
ह्याचाच पत्ता नाहीए

एखाद् दिवशी
आपल्याला जंक मेल समजून
डिलीट केलं जाईल
भविष्यात संसर्ग टाळण्यासाठी

६

खरं म्हणजे
डाऊनलोड करायला नको होतं तुझं पत्र
स्कॅनमधे सापडला होता

प्राक्तनाचा अनोळखी
मॅलिशीयस कोड
तरीही आपण होऊन
कॉपी केली तुला
माझ्या हार्ड डिस्कवर
अनोळखी ई-मेल्स उघडायला आवडतात मला
त्यात माझ्यासाठी काही तरी असेल
ही मूर्खासारखी आशा
बलात्काराने उघडवते माझ्याकडून
असले संदेश

७

मी ट्रॉय केव्हाच गमावलंय
ट्रोजन हॉर्सीस केव्हाच शिरलेत
माझ्या किल्ल्यांमधे
हे हेक्टरचं प्रेत
हा थकलेला युलिसीस
हा पॅरीस व हेलनचा
जळालेला शयनखंड
ही करपलेली मेमरी
ह्या करप्ट फायली
अगम्य गिचमीड लिपीत लिहिलेल्या
हा हॅंग झालेलाय कर्झर
रिस्टार्ट करूनही काय फायदा आहे

८

माझे डोळे झिप करून पाठवलेत
ॲटॅचमेन्ट म्हणून
एकदा तरी उघडून वाच
डिलीट करण्यापूर्वी

९

माझी फायरवॉल
नादुरुस्त आहे
संपलीय माझी प्रतिकार शक्ती
कोणीही मला हॅक करू शकेल
कोणीही माझी गुपीतं वाचू शकेल
मी नागडा झालोय
उद्या माझा पासवर्ड बदलून टाकाल
आणि माझं असं काहीच राहणार नाही

१०

आम्ही पाठवत राहू शब्दांचे लाकडी घोडे
हेलन परत मिळण्यासाठी
लक्षावधी रक्तवीर्य जिनेटीक कोडधाड
निघतील त्याच्या पोटातून
पार वाट लावतील
तुमच्या सिस्टीमची

११

मला पुसून टाकायचेत
चंद्रावर उमटलेले माझ्या बोटांचे ठसे
सूर्यावर पडलेले चहाचे डाग
माझ्या जॉयस्टिकवरच्या माझ्या हस्तरेषा
कुबड्या कॉम्प्युटरच्या डोळ्यातला अगम्य भाव
स्वत:च्या अस्तित्वाच्या सर्व खुणा
झिप करून
शेवटच्या ई-मेलला अॅटॅच करून
हजारो अनोळखी आयडींवर करायचाय
माझ्या असत्य अशिव असुंदर विषाणूंचा भडिमार
हजारो अनोळखी लोकांच्या नुकसानात तर आहे
माझा फायदा

◆

## व्यामोहाचा डोंगर पसरलाय समोर

व्यामोहाचा डोंगर पसरलाय समोर
अजस्त्र काळोखाची काया
पापाहून जड
इतिहासाहून जुना
झोपलाय वरदान घेऊन
घोरतोय ठाऊक नाही केव्हापासून असाच

त्याच्या मडक्यासारख्या बधीर कानात
गातात फुलपाखरं आपली
छोटीमोठी गाणी

कबूल
आपण त्याला उठवू शकत नाही
पण
अधूनमधून हलवू तर शकतो

◆

## कधीही जाग येत नाही ह्या किल्ल्यांना

कधीही जाग येत नाही ह्या किल्ल्यांना
पडलेत उद्‌ध्वस्त ढासळलेले
जर निरखून पाहिलंत तर दिसतील त्यांच्यात
मेलेल्या पोवाड्यांचे आभास

मस्तानीच्या गळ्यासारखी नाजूक
एखादी सकाळ
जेव्हा सह्याद्रीच्या पोलादी छातीला
अलगदच स्पर्शते तेव्हा
जागी होतात तान्ही आभाळं
तुडवलेल्या दगडांच्या अदृश्य डोळ्यांत

पाखरं ऊसाच्या शेतात परततात.

पण अजून विळखा घालूनच आहेत
हे किडक्या हिरड्यांचे आदिम किल्ले
ज्यांचे दात पिवळे पडलेत
जख्खड म्हाताऱ्या पोथ्यांच्या पानांसारखे.

नऊवारीत नटलेले शब्द
म्हातारे होऊन वळतात
आणि सामील होतात
जर्जर चेहऱ्यांच्या वारीत.
त्यांच्यात असलेला
मातीच्या आपुलकीचा ओलावा
आज बोलतो भाषा उत्स्फूर्त द्वेषाची.

काही हातांना मेलेल्या ढोरांचा वास
तर काहींना मारलेल्या माणसांचा.

कधीही ज्यांना जाग येत नाही
असे हे म्हातारे गनिमी किल्ले
अजूनही टपलेत
हावऱ्यासारखे
ह्या साजणीच्या डोळ्यांसारख्या सकाळीवर

सावध व्हा मावळ्यांनो
तुमच्याच किल्ल्यांच्या
निष्ठुर जबड्यांपासून

◆

# आज ती उरलेल्या दहा हजार लालभडक तोंडांनी गाते

आज ती उरलेल्या दहा हजार लालभडक तोंडांनी गाते
एकच गीत.
न शमणाऱ्या वाढतच जाणाऱ्या वखवखीचं गीत.

नाही, त्या जिभा नव्हेत
ती गुलाबी शिश्नं आहेत
सोन्यातून सूर्य प्यालेली
चांदीतून चंद्र प्यालेली
आणि प्रत्येकावर आहे एक
हावरा डोळा

आणि दहा हजार सुकलेल्या तोंडांनी ती गाते
एकच गीत.

स्वत:चंच
हळूहळू सगळीच विशेषणं, नामं, सर्वनामं नाहिशी होतील
फक्त 'मी' राहील अन्
'मला' आणि 'माझं'

पण तिला डोळे कधीच नव्हते
प्रकाशाची गीतं खरं तर तिला आलीच नाहीत
जेव्हा जेव्हा तिनं गायली प्रकाशगीतं तेव्हा
अव्याहत वाहत होती तिच्या भूगर्भात
विटाळशी काळोखाची धारा.
हो, एक गोंधळ मात्र जिवंत होता खरा.
आज तिच्या दहाही दहा हजार तोंडात उरलंय

एकच गीत
एक दिवशी सगळीच तोंडं नाहिशी होतील
एकच तोंड राहील
त्यात एकच गीत
एकाच सुरात.
◆

## बाजारात भेटलेल्या हत्तीसाठी दोन शब्द

तुझी दया येते जेव्हा
तुझ्या जाड सुरकुत्यांनी भरलेल्या काळ्या देहाची तुलना
तुझ्या गोल पाणावलेल्या केविलवाण्या डोळ्यांशी करतो.

तू शूर असशील, डोक्याने धडक देत असशील
किल्लेद्वारांच्या खिळ्यांवर
पण तू क्रूर नाहीस पाताळयंत्री नाही.
नाहीतर माहुताला बसूच कशाला दिलं असतंस
तुझ्या राजस्वी पाठीवर?

तू बुद्धिमान असशील, बुद्धीची देवता असशील
पण चलाख मात्र नाहीस
नाहीतर नामुष्की कशाला पत्करली असतीस
ह्या भगव्या थोतांडाला बळी पडून?

तू आमच्या गजबजलेल्या बाजारातून
गंध लावलेल्या संधीसाधूंच्या मागे
डुलत झुलत
सूपासारख्या कानांनी माश्या उडवत जात असतोस तेव्हा वाटतं
की आम्ही नुसतं भीक मागायचं साधन बनवलंय
तुझ्या गोड रानटी काळ्या आत्म्याचं.

तुझ्या मागे पोरं, कुत्रे आणि बघ्यांचा घोळका होतो.
मी मात्र कधी तुझ्या खांबासारख्या पायाला
दोरीसारख्या शेपटीला, भिंतीसारख्या पाठीला अन्
झाडाच्या बुंध्यासारख्या सोंडेला हात लावून
तुझ्या खऱ्या आकाराचे
अनुमान लावण्यात गुंग होतो.

◆

## मी माझ्या खऱ्या नावानेच

मी माझ्या खऱ्या नावानेच खोलीत शिरतो
स्माईलींचा हसरा मुखवटा घालून
सर्वांना रामराम म्हणीत
पण माझ्याकडे कोणी ढुंकूनही पाहात नाही
तात्याविंचू सेक्सीसॅमबरोबर भंकस करत असतो
ती-फुलराणीच्या मागे एक-धागा-सुखाचा हात धुवून लागलेला असतो
केदार - बापट ७९, मृण्मयीबरोबर भंकस करत असतो
किंगकोब्रा माद्यांच्या मागे हुंगत फिरत असतो
मी माझ्या मेसेन्जरवर अक्षरं उमटण्याची
एकटा वाट पाहात असतो
ताटकळत मिणमिणत्या कर्झरसारखा
भंकसपणा करणाऱ्या असंबद्ध नावांच्या माळरानात
माद्यांना उदासीनपणे हुंगतो
मुखवट्यामागच्या प्रोफाइली चाळतो
पण माऊसची वाफ दवडण्याची इच्छाच उरलेली नसते
कारण त्या संभाषणं अर्धवट सोडून नेहमीप्रमाणे
चांदीच्या वांझोट्या स्क्रीनच्या गूढ क्षितिजापलीकडे अंतर्धान पावतात
मी माझ्या मेसेन्जरच्या रिकाम्या नजरेच्या
मेसेज बॉक्समध्ये स्क्रीनवर उभा असलेला माझ्याच
एकलकोंड्या संदेशाकडे
तासन्तास
पाहात बसतो.

◆

## गाड्यांसाठी खुळी पळापळ, गर्दी, धुरळा

(नवसारी रेल्वेस्टेशनवरच्या बौद्ध भिक्षूस)

गाड्यांसाठी खुळी पळापळ, गर्दी, धुरळा
बॅगासूटकेसी घेऊन धावाधाव करणारे लोंढे
मुलं मुली पोटं सुटलेले कर्मचारी व्यापारी लटांबरं
सगळे उत्सुक कुठेतरी जाण्यासाठी

मात्र तू तेवढाच इथे उभा राहणारा

तासन्तास उभा भगव्यात, डोळेही न हलवता
शांत स्थिर विसावलेल्या नजरेनं सगळ्या
तमाशाकडे पाहणारा त्या गढूळ गोंधळलेल्या
जगात स्वत:चं प्रतिबिंब पाहता पाहता
स्वच्छ अंतरीच्या आरश्यात ह्या धुमाकुळीला पाहता पाहता
पाहाणारा उरत नाही की पाहिलेलं उरत नाही

उरतं ते फक्त पाहणं

मी जेव्हा तुला पुतळ्यासारखा उभा बघतो
ऐन तारुण्यात डोक्याचा चकोटा केलेला असा
तेव्हा वाटतं की आम्ही सगळे प्रवासी
कुठेन्कुठे पोहोचण्यासाठी आसुसलेले बिनडोक पळापळ करीत
तू तेवढाच जाणणारा की
की पोचायचं कुठेच नसतं
फक्त पाहायचं असतं

◆

## वलसाड

कधीपासून आपल्या जिभांची झाली आहेत
धुळकट बाभळीची मुळं कोणास ठाऊक
कोणास ठाऊक केव्हापासून आहेत ही
रुई बेशर्मी अन् निवडुंगाची कुंपणं आपल्या शेतांना
केव्हापासून कीड लागलीय आपल्या चिकूगराला कोणास ठाऊक

हे समुद्रकिनाऱ्यावरच्या वाळूत गाईच्या कवटीसारखं
दिपलेल्या डोळ्यांचं गाव
काळाच्या आरंभापासूनच पडलंय का इथे?
केव्हापासून जातोय त्याच्या डोळ्यांत समुद्राचा खारट वारा वाळू?
केव्हापासून उभं आहे असंच इथे नागडंउघडं गळून गेलेलं सागाचं वन?

आपलं फळ असंच होतं का अगदी सुरुवातीपासून
अर्धवट अश्लील अविकलेलं नाहीतर अर्धकच्चं?
आपण ज्या बोराच्या झाडाला लागलो
त्या झाडाची मुळंच दगडाळलेल्या वांझ मातीत होती

आपण तहानभूकभयाच्या ओंगळ हिरवट काळ्या रानटी वेलीवरची
शूद्रविषारी फळं, ज्यांच्या बीजातून जन्मतात
आपल्यासारखीच काळोखाची झाडं

◆

## औरंगा

एकाद्या सहज चक्कर मारायला
निघालेल्या मुलीसारखी
फिरत फिरत
आमच्या गावाच्या कुसाबाहेरून
तू निघून जातेस
तुझ्या शांत गोड ओल्या डोळ्यांनी
कुठेही न पाहता

माझ्या स्वप्नात येतात
तुझ्या शांत गाभाऱ्यातले
गोड्या पाण्यातल्या माशांचे थवे
तुझ्या तळातल्या वनस्पती-वेलींतून
भटकणारे

अन् मी टाकतो काठावरून
माझ्या गरीब हातांनी
माझ्या जाळ्यांची लक्तरं
तुझ्या शांत पाटावर
तुला पकडण्याच्या अपेक्षेनं

◆

## सुपरव्हीजन

दुपारच्या कंटाळलेल्या रखरखाटात
जांभया पेपर सोडवतात
बहुतेक ह्यालाच बौद्धांनी शून्यता असं नाव दिलं असेल

मीही सामील होतो
वाळवीने पोखरलेलं ठणकणारं मन घेऊन
क्षणांच्या तुंबलेल्या प्रेतयात्रेत

खटारा झालेल्या अवजड यंत्राच्या धुडाचे
आपण सगळेच गंजलेले थकलेले भाग
आपल्या शिळ्या आत्म्यांसारखीच
आपल्या शब्दांनाही बुरशी येते
आणि पसरतो आपला कुबट वास सर्वत्र

घंटा
थोड्याच वेळात
हातातल्या पेनांचं हस्तमैथून थांबेल
काळाचं ओंगळ इंधन गळून संपेल

ह्यालाच बहुतेक लोक मोक्ष म्हणत असावेत

◆

## भूज भचाऊ अंजार : जवळजवळ वर्षभरानंतर

उजेडाच्या अंतिम संस्कारात
फिरता फिरता मला सापडली
जळून कोळसा झालेल्या एका सूर्याची
अर्धवट जळालेली कवटी
तिच्या डोळ्यांतून वाळूसारख्या झरणाऱ्या रात्रीनं व्यापलं
सारं हादरलेलं जग
थोड्या अंतरावर तर मला चक्क सापडली
अशाच कवट्यांची दूर दूर पसरलेली शेतं

किडके दात असलेल्या पृथ्वीच्या पोलादी जबड्यानं
घास घेतला आमच्या पोराबाळांचा
अनेक रथांच्या चाकांचा
असंख्य अगतिक आभाळांचा
धरणी आई
कसं बरं खाल्लंस
स्वत:च्या पोटच्या पोरांना?

आता आम्ही अश्रूंनाही विसरलोय
आता आमच्या डोळ्यांच्या दूर दूर पसरलेल्या
बिथरलेल्या भग्नावशेषातून झिरपतायत
शुष्क रिकामी वाळवंटं

◆

## खग्रास वड

(गोधरा हत्याकांड व नंतरच्या दंगली)

जो आकाशाएवढा खग्रास वटवृक्ष
लावलाय आपण आपल्या अंगणात
त्याच्या सायनाइड सावटाखाली
आपण किती वेळ जगायचंय कोणास ठाऊक

त्याच्या उगम निगम विस्ताराचं गूढ कोडं
फोडण्याचं धाडस कोणीही दाखवणार नाही.
कारण आपणच त्याला घालत आलोय
अर्भकांच्या फुटक्या कवट्यांचं खत
फाटक्या रडणाऱ्या योन्यांच्या डोळ्यांनी
आपण त्याच्याकडे कधी पाहिलंच नाही
त्याच्या खाली
जळणाऱ्या त्वचेचा दुर्वास
सर्वत्र पसरतो
आणि आपण सनातन सनातनी बघे
नाक दाबून पळून जातो

आपण त्याची पाळंमूळं खणून पाहणारच नाही
कारण ती खणताना
आपल्याला सापडतील
आपल्याच छातीत
त्याच्या आरसनीक पारिंब्या

◆

## प्रत्येक वर्षाची दीड सुरकुती धरलीत तरीही

(करंजीया टीचरसाठी)

प्रत्येक वर्षाची दीड सुरकुती धरलीत
तरीही जवळ जवळ दीडशे सुरकुत्या
आज तिच्या खचलेल्या चेहऱ्यावर दिसतात

छोट्याशा उदास घरात
रिकामे डोळे घेऊन आज
तिची एकटी सावली वावरते

एकेकाळी ती शुभ्र साडी नेसून
आम्हा थेंबभर पोरांना
देवाच्या अनंत प्रेमाविषयी सांगायची
शेंबड्या भाबड्या पोरांना
Live in the Now! Live in the Now!
असं बजावून सांगायची

माझी अक्षरं पाहून, केटकर तुझं टाळकं
म्हणजे निव्वळ कचऱ्याची टोपली आहे
असं म्हणायची

आज जेव्हा ती मला
जुनाट पिवळ्या कागदावर मिटत जाणाऱ्या डागासारखी दिसते

तेव्हा तिची खिन्न डोळ्यांची
एकाकी सावली पुन्हा
Live in the Now! Live in the Now!
असं सांगू शकेल?

◆

## कानातून उगवलेल्या दहा दगडी जिभा

कानातून उगवलेल्या दहा दगडी जिभांनी
मी चाटत बसायचो
काळ्या शब्दांच्या कवट्या
त्यांच्या असंख्य रसाळ योन्या
जेव्हा जेव्हा ते येऊन बसत
कावळ्यांसारखे माझ्या गच्चीत

पण त्यांनी जेव्हा सुरुवात केली आणायला
मनुष्य मांसाचे जळके तुकडे
अर्भकाचे डोळे बायकांच्या किंकाळ्या
तेव्हा कानातून उगवलेल्या दहा दगडी जिभा
मी कच्चकरून चावल्या

रूई बेशर्मीच्या घृणास्पद रानात
लोंबकळणारी माझ्या डोळ्यासमोर येतात
आपल्या सर्वांची प्रेतं
नागडी रक्तबंबाळ उलटी टांगलेली
निष्पर्ण गोरखचिंचेवर

नक्कीच आपल्या सर्वांच्या मुळात असली पाहिजेत
दगडांची बीजं
वांझ कोरडी
ज्यांच्यावर कधीच उगवणार नाही
घृणेची शरमेची काळी फुलं
पण त्या दहा जिभा तोंड काढून बोलतीलच पाहा
फणा उचलून टाळूला भिडवतीलच पाहा

अन् ओकतील मध्ययुगीन गरळ
सर्वत्र.

कानातून उगवलेल्या दहा दगडी जिभांचे
झालेत आसुरी देह
ज्यावर चढवतायत सगळे
तुमचं आमचं व्यर्थ रक्त

◆

## अवाढव्य सुटत गेलेल्या बाजारातलं एक शहर

(सुरतसाठी)

अवाढव्य सुटत गेलेल्या बाजारातलं
एक शहर
शॉर्टकट व उड्डाणपुलांचं एक क्लिष्ट जाळं
ज्यात फसलीयत सूर्याची पिल्लं.
इथं सूर्यावरही कचरा साठतो आणि
सूर्यपुत्रीचीही होते गटार.
पण खरं म्हणजे
लेप्टोस्पायरोसिसचा संर्सग
नजरेलाच झालेला असतो.
पोतंभर प्लेगचे उंदीर
त्यांच्या वखवखलेल्या पोटात
इथं दुकान व घरांना विभागणारी सीमा
अस्पष्ट असते. घरं कुठे संपतात
दुकानं कुठे सुरू होतात
हे सांगणं कठीणच आहे.
इथं वेगवेगळ्या पुढाऱ्यांचे पुतळे
वेगवेगळ्या दिशेने बोटं दाखवतात
पण सुरत कुठेच जात नाही
हॉर्नच्या कर्कश कानठळ्या बसवणाऱ्या चौघड्यात
आणि विषारी धुराच्या ढगात
तसंच तिथेच बसून असतं
लालभडक लिपस्टिक लावून
सगळी गिऱ्हाइकं संपली तरीही
आणखीन दोन गिऱ्हाइकांची वाट पाहात.

◆

## मुहम्मद खान यांस

१

तुझ्या थडग्यावर बाजार भरण्याअगोदरच
आम्हाला तू लाभलास
ह्याचाच केवढा आनंद
तुला शतकानुशतकांपासून लाभलेल्या
विस्मृतीच्या दगडी शांततेत
आम्हाला सामील केलंस हाच केवढा उपकार
साधं विसावण्याकरिता
कारण ज्या दुतोंडी शहरात पाखरं
अपराध्यासारखी लपत फिरतात
त्या शहरात
तुझ्या आतापर्यंत उपेक्षित आत्ममग्न मकबऱ्याजवळ
थोडी जागा दिलीस, हिरवळ दिलीस.
तसं पाहिलंस तर, बंधू,
आपण दोघांनी अक्षम्य चूक केली
मी प्रेम करण्याची, तू मरण्याची

२

तुझ्या थडग्याचा कोणी असाही उपयोग करेल
ह्याची कल्पना फारशी नसेल तुला.
पण तुझी आठवण अशा रीतीने जिवंत राहील
ह्याची कल्पनाही कुठे होती तुला
तू न्यायप्रिय होतास की जुलमी
धर्मांध होतास की मवाळ, धूर्त होतास की सरळ,
हे प्रश्न दुय्यम आहेत
महत्त्वाचं म्हणजे तेव्हा
मी तिला मिठीत घेतलं

आणि सायंकाळी तांबडा सूर्य
जसा वितळत जातो रक्ताळलेल्या समुद्रात
तसे तिचे ओठ वितळत होते माझ्या ओठांवर
तेव्हा आमच्यावर सावली होती
आमच्या पितरांच्या आशीर्वादासारखी
ती तुझी
हे कसं विसरू आम्ही ?

## ३

तू म्हणशील शतकांपूर्वीच्या
मेलेल्या मुसलमानाचं आज मणभर कौतुक कशाला?
खरं तर बंधू
आज तूही कबूल करशील की
मशिदी पाडून त्यांवर मंदिरं बांधल्याने
किंवा मंदिरं पाडून त्यांवर मशिदी बांधल्याने
काहीच फरक पडत नसतो
कारण आपल्यातलाच कोणतातरी अवयव कुजलेला असतो
आपल्यातच असतो रानटीपणा
शोधत असतो द्वेषासाठी निमित्त
आपल्यातच असतं एक न संपणारं मध्ययुग
आणि आम्ही जेव्हा आलो तुझ्या दाराशी
तेव्हा बरंच विष आम्हीही जिरवलं होतं
आमच्या हाडांमधे
आणि बाहेर जेव्हा
द्वेष ईर्षा व रानटीपणाचा वणवा पेटलेला होता
तेव्हा आमच्यातल्या थोडाश्या ओलाव्याला, थोड्याश्या गोड वेडाला
आश्रय दिलास
नवस न करताही पावलास
हेच काय कमी आहे?

◆

## प्रसूतिगृह दवाखाने हॉटेलं दुकानं देवळं

(स्टेशनरोड, नवसारी)

प्रसूतीगृह दवाखाने हॉटेलं दुकानं देवळं
पिंपळाखालचं पोलीस स्टेशन शाळा बँका
हातलारीवर फाफडा जिलब्या चहा कॉफी नाश्ता
ट्यूशनं धूळधुरळा ट्रॅफिक वेश्या वेड्यांचे दवाखाने
जणू सगळं जगच गोळा झालंय या रस्त्याच्या शोकसभेत
का उठून घरी जात नाही हा रस्ता समजत नाही.

थकलेली सकाळ सबंध दिवसाचं अवजड दफ्तर उचलून
शाळेत जाण्यासाठी रिक्शाची वाट पाहात उभी असते.
खिळखिळ्या म्हाताऱ्या बसमधून तरुणांचे लोंढे उतरतात
अन् कॉलेजला किनारा समजून नदीत पाचोळ्यासारखे
वाहात गोळा होतात
सफेद शाकाहारी टक्कल पडलेलं वैराग्य
उघड्या पावलांनी रस्त्याचं हरवलेलं टोक शोधतंय

हा रस्ता कुठून सुरू होतो कुठे संपतो कोण जाणे
चौऱ्यांशी कोटी योनींचा यात्री हा रस्ता
फिरून फिरून जिथे सुरू होतो
तिथेच संपतो.

हजारो वर्षांनंतर जर तुम्ही त्याची कबर खोदून पाहाल
तर हेच डांबरी राखोडी प्रेत
स्थितप्रज्ञ डोळ्यांनी तुमच्याकडे निर्विकार पाहात राहील.

◆

## एका कॉम्प्यूटर ऑपरेटरसाठी चिट्ठी

घाणेरड्या चित्रांनी भरलेल्या करप्ट फ्लॉपीसारखा
माझा आत्मा करप्ट झालाय

त्यावर आता काही स्टोर करता येत नाही

म्हणून तुझ्या डोळ्यांच्या भकास मॉनिटरमधे

UNABLE TO READ FROM THE SPECIFIED DEVICE
RETRY/CANCEL चा मेसेज बॉक्स

आता तो दुरुस्त होण्यापलीकडे गेलाय

जमल्यास फॉरमॅट कर
क्विक इरेझ कर
नाहीतर सरळ टाकून दे त्याला

कचऱ्याच्या टोपलीत

◆

## तुझ्या अंधारलेल्या गुहेतले

कधीचेच

तुझ्या अंधारलेल्या गुहेतले
कित्येक हिरवे फ्लोरोसंट वाघ
येऊन राहिलेत माझ्या काळ्या बांबूच्या वनात

तुझ्या भूगर्भातल्या ओढ्याचं गोड पाणी
प्यालेत ते स्वत:च्या हिरव्या खडबडीत जिभेने
म्हणूनच ह्या पाण्याची चव
दरवळतीय माझ्या बनात

माझ्या नजरेच्या उजेडावर लागलेत
तुझ्या गुहेतल्या जांभळ्या
प्लॅटॉनिक फुलपाखरांच्या पंखाचे रंग
सोनकेळ्यांचे घड
मधमाश्यांची पोळी

मी कधीचीच बाटवलीय तुला
कधीचाच भेदलाय तुझ्या मनाचा
हिरवा कौमार्यपटल
केव्हाच घेतलाय
तुझ्या ओल्या मनाचा कश
कधीच उष्टं केलंय तुझ्या आत्म्याला

◆

## काळं निळं विष वाहतंय

काळं निळं विष वाहतंय
जगाच्या शिरांतून
धमनीतून
संगणकाच्या विद्युत जाळ्यातून
साखळलेल्या आकाशाच्या रक्तवाहिन्यांतून
तेच वाहतंय तुझ्यातून माझ्यातून
आणि
आपल्या काळ्या कल्पवृक्षाला लागलीयत
जहाल विषारी फळं.

हा संपूर्ण गोफच विषारी आहे ना.

पण आपल्या अश्रूंमधे अजूनही ठेवायचीय
डोळस श्रद्धा.

डंखांच्या चक्रीवादळात,
मी अजूनही ठेवून आहे
मधाची आशा
तुझ्या ओठांच्या मेणात.

आपल्याला समजून घ्यायचंय
विषाचं प्रवाह तंत्र द्वेषाची षड्यंत्रणा
वारश्यात मिळालेली अश्रद्धा व शत्रुत्व
आणि विषारी फळ देणाऱ्या कल्पवृक्षाची
अगम्य मुळं.

◆

## चार रूपककथा प्रेमाच्या

१

तिच्या देहावर फक्त
तिच्या डोळ्यांचं हास्य पांघरून
ती मला येऊन बिलगते

मग हळूच एक चिठ्ठी
माझ्या पाठीमागून
दुसऱ्या एका तरुणाला देते

२

शयन खंडात
तिच्या निर्वस्त्र अंगावर
फक्त स्ट्रॉबेरी व सफरचंदाच्या स्वप्नांची
मलमल असते

माझे हात अधीर
कोणीतरी ओढल्यासारखे
तिच्या रेशमी मांड्यांकडे जातात

पण मी
फक्त तिच्या मिटलेल्या पापण्यांचं
चुंबन घेऊन
निघून जातो

३

माझ्या वासनेचा
ठेंगू दैत्य
मला रात्रभर
पायाखाली तुडवतो.

माझ्या तोंडात चव राहते
संपूर्ण लाचारीची.

४

आमचा समागम

जगातल्या पहिल्या
अन् शेवटल्या
स्त्रीपुरुषाचा समागम

*(नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट, लंडनमधल्या वेरोनीझच्या*
Allegories of Love *ह्या चित्रचतुष्टकावर आधारित)*

◆

## धुनी

का वाहून नेलंस तुझ्या ओघात?
मी एक अखंड धुनीतलं लाकूड
जळून झाल्यावर अंगारा होऊन पडेन
तुझ्या काठच्या ओल्या वाळूत.

केव्हा विझतील
माझ्या अंत:करणातले
ओले हिरवे निखारे?

पण उत्तरं तुझ्याकडेही नाहियेत
कारण तुझा ओघ हा काळाचा ओघ
ही अखंड धुनीही काळाचीच
आणि काळाला सवय कुठाय
माणसाच्या प्रश्नांची उत्तरं देण्याची?

पण माझ्या हळूहळू जळणाऱ्या देहावर
येतो थवा सुतार पक्ष्यांचा
आणि टोचून टोचून करतात ते
माझे अतोनात हाल.

◆

## निष्ठुर रिकाम्या उन्हाची नजर

निष्ठुर रिकाम्या उन्हाची नजर
चुकवून आलो होतो आपण
त्यक्ता बागेच्या उथळ हिरव्या प्रकाशात

आपल्या बोटांची झाली
प्रश्नचिन्हं
आणि गुंतत गेली एकमेकांच्यात
उत्तरांच्या शोधात.

दोन शब्दांमधल्या फटीतून
दिसत होती अव्यक्त अंधाराची तिरीप

निदान तुझ्याकडे गोष्टींचा डबा तरी होता
माझ्याकडे होती ती फक्त अर्धवट खरडलेल्या
कवितांची कडूजार चव.

तुझ्या डब्यातल्या सफरचंदातून
बाहेर आलेल्या गोष्टींच्या असंख्य काळसर्पांना
तुझ्यावर सर्वत्र फिरताना मी पाहात होतो
पारव्यासारखा लाचार होऊन

शोधत होतो
तुझ्या गोष्टींच्या थव्यांपलीकडची तू—
माझ्या अर्धवट मेलेल्या कविता
घेऊन स्पर्शांचे सोंग
शोधत होत्या
त्यांची शेवटची ओळ.

◆

## शवपेटीत खिळे ठोकताना

मी एक एक खिळा उतरवतो
तुझ्या थंड नग्न देहात
स्तनांच्या बरोबर मधे एक

दुसरा थोडा वर
तिसरा त्याहून थोडा वर
मग तुझ्या बुबूळाच्या छिद्रात
तुझ्या ओठांवर
दोन डोळ्यांच्या बरोबर मधे

कारण तू माझी शवपेटिका

तूच माझं घर
तुझ्याच श्वासांमधे मी शोधतो
अब्राहामचा लुप्त झालेला धर्म

तुलाच चढवतो मी सुळावर
अस्सल भारतीय संस्कृतीला धरून
तुला पेटवतो मी जिवंत
तुझ्या निवत चाललेल्या राखेत
माझे कोमट अश्रू
फ्रँकेस्टाइन फिनिक्स होऊन

मला जोहार करू दे
तुझ्या भिंतीत चेंगरून ठेवलेल्या
चितेमधे

किंवा एक काळं कडूजार फळ होऊन लागू दे
तुझ्या अज्ञात कबरीवर उगवलेल्या सफरचंदाच्या झाडावर

◆

## तुम्ही वॅक्सट्रेमध्ये उताणे पडलेले असता

तुम्ही वॅक्सट्रेमध्ये उताणे पडलेले असता
स्टीलचे खिळे तुमच्या हातापायांना
मेणात अडकवून ठेवतात
क्लोरोफॉर्म दिलेलं असतं तुमच्या गुंग मेंदूला

ती दुष्ट गंजक्या कटरने
कडाकड तुमच्या बरगड्या कापते

थकलेल्या ध्वस्त फुफ्फुसांना
थंड निर्दय स्केपलने बाजूला सारते

आणि तिच्या कबूतरी हातात
तो बुळबुळीत धडधडणारा घाणेरडा अवयव घेते

त्याला पाहून तिला तिच्या हायहिलखाली चेंगरलेल्या
काळ्या मातीतल्या तपकिरी बेडकीची आठवण येते

खरंच तुमचे हे अगतिक अवयव
इतके उघड्यावर कधीच पडले नव्हते

◆

## अगोचर

ओठांवर तुझ्या
विंचूच विंचू

डोळ्यात तुझ्या
शुभ्र कबुतरांचे थवे

पौर्णिमेचा अस्वस्थ मधाळलेला समुद्र
तुझ्या स्तनात

अन् श्वासात
विझणाऱ्या उल्केचा वास

कोट्यवधी वर्षांपासून
भास होतोय मला तुझा
ह्या डोळ्यात रिकामी गर्दी असलेल्या
रस्त्याच्या भूलभूलैयातून
जाता येता

कोट्यवधी वेळा
तुला पाहण्यात
ठेच लागलीय
माझ्या रात्रींना

अन् असंख्य वेळा
पिंजून रक्तबंबाळ केलायस
माझा पारदर्शक श्वास
पण म्हणतात ना
नासूरांचा संबंध सुरांशी असतो
आणि वेदनांचा व्यंजनेशी असतो

म्हणूनच असंख्य स्वरूपं घेऊन
पुन्हा पुन्हा दिलेत फुलपाखरांचे पंख

अगणित राठ शब्दांना

कित्येकदा टाकलेत त्यांना
जगण्याच्या भट्टीत
अन् वितळवलंय त्यांच्या पोलादी आत्म्यांना

हजारो पैलू पाडून
हिऱ्यांचं लखलखीत हास्य दिलंय
त्यांच्या डोळ्यांना

म्हणूनच ऐक
स्पर्शाच्या नजरेला जरी अगोचर
असलीस तरीही

पाहीन तुला
कवितेच्या कोट्यवधी डोळ्यांनी
काळाच्या अंतापर्यंत

◆

# माझ्या डोळ्यांच्या गढूळ काळवंडलेल्या तळ्यातून

माझ्या डोळ्यांच्या गढूळ काळवंडलेल्या तळ्यातून
पाणसाप डोकं वर काढतात
कल्पना नव्हती मला
इतके सगळे असतील हे क्रूर गूढ प्राणी
ह्या भयाण अरण्यातल्या हरवलेल्या तळ्यात

विषारी केलंय माझ्या नजरेला त्यांनी

आहेत का तुझ्याही तळ्यात
त्यांची बिळं?

तो पाहा केवढा मोठा पाणसाप
सळसळत बाहेर पडतोय
बिळातून

केवढा प्रचंड लांब

कित्येक फर्लांग लांब असेल तो

अजूनही बाहेर निघतोयच तो

◆

# एका कासवाचं संक्षिप्त प्रवासवर्णन

कित्येक शतकांपासून
जोपासलीय मी
ही संथपणाची वासना

स्वत:मागे स्वत:ला लपवत
खडकांमधे खडक होत
मी वाहतोय संथपणे
ह्या अनंत खडकाळलेल्या परिसरात
डोहकाळिमेच्या शोधात

पाठीच्या ढालीमागे लपवीत लुसलुशीत पोट
अगतिक पोटामागे लपवीत टणक ढाल
मी गेलोय निघून
क्षण आणि शाश्वताच्या पलीकडे
दगडांच्या पैलूंच्या निष्ठुर धारेवरून
कोणत्यातरी आदिम डोहाच्या बाहुपाशाच्या शोधात

◆

# शार्क

आरशाच्या कडूजार मांसल पाण्यातून वाहतात माझी शार्क बोटं
केसाळ काळ्या झाडाझुडपातून डोहाच्या डोळ्यांखालून विचारांच्या खडकांखालून
ती वाहतात खात बारीकसारीक मासे.
मी उबवतो डोळ्यातल्या तपकिरी घरट्यांमधल्या पांढऱ्या वेड्यावाकड्या अंड्यांची दुःखं.
त्यांच्या थकलेल्या कोरड्या भुकेचे मातकट पंख झेपावतात आभासी देहावकाशात.
माझ्या मनाच्या सिम्बॉलिक आरशात त्यांची प्रतिबिंबं पोहतात
पाठीवर वाळवंटाची साम्राज्यं घेऊन
दिसतात स्फींक्सच्या सावकाश पाउलखुणा त्यांच्या आकाशात.

माझ्या बोटांच्या वखवखलेल्या क्रूर गोल डोळ्यांना पाहून मीच हादरतो.
त्यांच्या अगतिक मांसाहारी वासनेचे कळप
वाहतात माझ्या कडूजार हिरव्या रक्तातून
तुझ्या तळहातावरच्या गोड नद्यांतून तुझ्या आभासी बेटांकडे

त्यांना वेसण घालणाऱ्या देवा, पाहा त्यांच्या नाकावरचं खरं रक्त
रक्ताचं प्रतिबिंब नव्हे, खरं रक्त माझ्या हारपून वरच.
दया कर ह्या मांसाहारी मुक्या जनावरांवर
रुतू दे त्यांचे दात पाणीदार आरशाच्या कडूजार मांसात
भरू दे त्यांचे अनुदार उदर प्रतिबिंबित मासोळीच्या थव्यांनी.

◆

# माझ्या पाठीवर विस्तारलेल्या कुरणात

माझ्या पाठीवर विस्तारलेल्या कुरणात
हिरवी थंड लव चरतोय रेडा.

जवळच्या डबक्यात वाळक्या फांद्या
मुडद्यासारख्या तरंगतायत.

अश्मयुगातल्या अनोळखी
राक्षसी प्राण्यासारखा संथ
रेडा कुरणातून तरंगतो.

आपण
त्याच्या तुळतुळीत पाठीवरच्या माश्या
कातडीच्या धरणीकंपामुळे
पुन्हा पुन्हा उडायचं
पुन्हा पुन्हा बसायचं

◆

# समुद्रप्राण्याच्या वहीतून

"Poetry is the journal of a sea animal living on land, wanting to fly in the sky." Carl Sandburg (1878-1967) US poet, biographer; "Poerty Considered."

मी सायंकाळी वाळूत येऊन पडलेला जेलीफिश
माझं अस्तित्व अर्धपारदर्शक सोललेल्या ताडगोळ्यासारखं संदिग्ध अस्पष्ट

माझ्या देहाला हात लागला तर अनावर कंड सुटतो अशी तुमची समजूत
मी म्हणजे काय पदार्थ आहे ते पाहण्यासाठी
तुम्ही मला काडीने ढोंगसून पाहता, पालथून पाहता.
मी एक क्षुल्लक कुतूहलाचा विषय
मला विसरून तुम्ही समुद्रावर गम्मत जम्मत करायला निघून जाता

आज समुद्रानेही माझी संगत सोडलेली दिसते
तो पळून गेलाय क्षितिजावर मावळणाऱ्या सूर्याकडे मला एकटा टाकून
समुद्रात आणि माझ्यात ओल्या वाळूचा आरसा
ज्यात थकलेल्या सूर्याचा केशरी अनुराग अन् रिकामं एकटं आकाश

माझं खरं घर अथांग
माझं स्वप्न पारदर्शक सागरपक्षी होऊन पंखाखाली क्षितिजं घालायची

मी निर्विकारपणे वाट पाहतोय — अथांगाची साद लाट होऊन येईल
आणि मी पंख पसरून झेपावीन अनंतात

◆

# एक पांढरा बोका गलेलठ्ठ

एक पांढरा बोका गलेलठ्ठ
राहतो माझ्या खांद्यावर घरटं बाधून
त्याच्या सुस्तावलेल्या गूढ सोनेरी डोळ्यांत
एक संथ सखोल वासनेचा सागर विस्तारलेला
माझ्या नजरेच्या भलत्याच दिशेनं
फिरत असते त्याची व्यभिचारी भटकी नजर
आणि चुकत असतं सतत
माझ्या नजरेचं गुरुत्वाकर्षण केंद्र

खडबडीत जिभेने दूध पिताना तो डोळे मिटतो
पांढरे शुभ्र केस पिंजारताना त्याचा गुरगुरण्याचा आवाज
माझ्या कानाशी घुटमळतो
त्याचं घर जरी माझा खांदा असला तरीही
त्याला च्यायला सूक्ष्म मादक वास येणाऱ्या
बायकांच्या मांड्यांवर खेळायला आवडतं
त्यांच्या छातीशी बिलगायला आवडतं.

कधीतरी हा आळशी ढोण
जागचा हलत नाही
तर कधीकधी तो कुठेही उंडारायला निघून जातो साला

झालाय का कधी तुला झोपेत
त्याच्या टोकदार पांढऱ्या मिश्यांचा स्पर्श?
तू ऐकला आहेस का रात्री झोपेत
ह्या स्वच्छ पांढऱ्या सैतानाचा
खोलगट गुरगुरण्याचा आवाज?

◆

## माझ्या डोळ्यांतच बीळ बनवून राहतोय

माझ्या डोळ्यांतच बीळ बनवून राहतोय
हा हिरवा पिवळा गलेलठ्ठ बेडूक

तीन-चार ब्रह्मकल्पांची झोप आटपून
पाऊस पडताक्षणीच
तो माझ्या कपाळावर येऊन बसतो

आणि गळ्याचे फुगे फुगवून गातो
माद्यांसाठीची आपली
कर्कश ओंगळ गाणी

ऐका
साचलेल्या तळ्याच्या पलीकडून
येतंयं त्याच्या गीताचं
प्रतिउत्तर

◆

## अंडज

निरभ्र निळ्या वाघाच्या बेंबीतली कस्तुरी
मी शोधतोय माझ्या मनाच्या
कोरड्या बेंबीत
ज्यातून उगवलीत माझी
सहस्त्रहार दु:खं

तुझ्या अत्तरदेहात विखुरलेले
माझे कणभंगूर क्षण
अंतर्धान पावतात
प्रगट होण्यापूर्वीच

माझ्याकडे उरतात
ती फक्त शब्दांची काळसर कासवं
माझ्या रेताड त्वचेच्या काठावर
पांढरी अंडी घालून जाणारी

ह्या अंड्यांना फोडतात
माझ्या दुष्ट बोटांचे जांभळे काळसर्प
खाण्यासाठी
निरभ्रनिळ्या वाघांची
बुळबुळीत ओली पिल्लं

◆

## तरंगण्यासाठी काय काय करावं लागतं पाहा

डोळ्यांना होतायत काळोखाच्या
अन् सल्फ्यूरीक ॲसिडच्या उलट्या वारंवार
आतडी पिळून
आणि माझा आत्मा त्यातून वाहून जातो
मृत अर्भकासारखा.

जळून गेलेल्या धुमसणाऱ्या डोळ्यामागे
मी रिकामा होऊन
रिकाम्या खाचा बघत बसतो
एका दुर्लक्षीत कोपऱ्यात.
माझ्यासाठी सबंध जग रिकामं होतं.
हे अस्पृश्य काळं नास्तित्व होतो.
स्थळकाळाची बंधनं संपतात
आणि मी फक्त एक
निराकार ठुसठुसणं होऊन
तरंगायला लागतो
◆

## हे शहर निर्जनच राहिलं

रिकामे रस्ते रिकाम्या खोक्यांसारख्या इमारती
रात्री सहज माझ्यातून फिरायला निघतात.
उदास पिवळे स्ट्रीटलँप
पावलं न वाजवता माझ्यातून निघून जातात.
अशाच एखाद्या कोनाड्यात
माझ्या डोळ्यांच्या बुरुजांचे भग्नावशेष
आकाशाकडे डोळे करून पडून राहतात
त्याच्यातून एक थकलेला वारा भणाणतो.
येताना माझ्या खिशाच्या भोकातून पडून गेलेले
माझे शब्द मी वेचायला बाहेर पडतो
त्यांना अजून कोणी नेलं नाहीय.
हे शहर निर्जनच राहीलं.
तारे गळून गेल्यानंतर
निष्पर्ण आकाश कसं भकास झालंय.
त्याच्या मुळांना वाळवीनं कधीच पोखरलंय.
मी अतिशय आजारी पिवळ्या प्रकाशात
एका कोरड्या गंजक्या नळाखाली
उगीच ओंजळ धरतो
उगीच स्वत:च्या नाडीवर
हात ठेवून ठोके ऐकण्याचा प्रयत्न करतो
मनगटावरच्या घड्याळाबरोबर
तिलाही चावी द्यायची विसरलो होतो.

◆

## प्यालो जांभळे मूत चंद्राचे

दगड प्यालो
वाळू प्यालो
प्यालो घारे
डोळे चिमणीचे
मन प्यालो
आत्मे प्यालो
प्यालो असंख्य
क्षार मातीचे
मी पंख प्यालो
पिसं प्यालो
मी प्यालो
वीर्य आकाशाचे
सुसर प्यालो
वानर प्यालो
प्यालो शिंग
तांबड्या मांजराचे
तहान प्यालो
भूक प्यालो
समुद्र प्यालो
धुळीचे
साल प्यालो
सुरकुत्या प्यालो
प्यालो जांभळे मूत चंद्राचे

◆

## माझ्या फुटक्या बासरीतून

माझ्या फुटक्या बासरीतून काढत बसतो
धुळकट पिंजलेले बेसूर
अन् काही दुखरी आभाळं
लूत लागलेल्या निळ्या कुत्र्यांच्या पिल्लावळीसारखी
माझ्या आंधळ्या पायाशी घुटमळतात

मी त्यांच्या लूत लागलेल्या निळ्या केसांतून हात फिरवतो
अन् माझ्या फुटक्या डोळ्यांत पाहतो
माझाच थकलेला खिळखिळा चेहरा

माझ्या फुटक्या बासरीतून विचारतो
'कोणी मारले माझ्या ढगाळलेल्या फुफ्फुसात
व्यवस्थितपणे तांबारलेले वाकडे तिकडे खिळे?'
'बेंबीमागे लपलेला कोणता तांबडा लांडगा
चघळतोय माझं सत्व?'

◆

## टाइप करता करता अक्षरं

टाइप करता करता कधी कधी
साळुंक्या होऊन भुर्रकन उडून जातात
माझी अक्षरं खोलीच्या खिडकीतून

रस्त्याच्या कडेला
एकांतात विडी शिलगावणाऱ्या
वेड्याच्या दुर्गंधी जटांमध्ये
चंद्र होऊन अडकलेली सापडतात

कधी ती चौकातल्या टॉवरच्या
बंद पडलेल्या घड्याळासारखी
निर्विकार होऊन
काळाच्या धूळ खात पडलेल्या वहीत
मुकाट्याने पडून राहतात

कधी कधी ती ज्यासाठी विशेषण गवसणं अशक्य असतं
अशा एखाद्या नजरेत
सूक्ष्म हास्य होऊन वितळतात
तर कधी तरी माझी अक्षरं
प्लॅटफार्मवरच्या बेवारशी भिकाऱ्यांच्या झोपेत
स्वप्न होऊन सडतात

जेव्हापासून
मुंग्या येण्याअगोदर
पिंजऱ्याचं दार उघडून
उडवून लावलंय मी
कुजक्या आकाशाच्या तुकड्याला
तेव्हापासूनच
सहजच पिंजऱ्यात येऊन बसतात
माझी अक्षरं

◆

## उद्ध्वस्त रात्रीचं नक्षत्रगान

ठाऊक नसेल बहुतेक तुला
तुझ्या योनीतून निघालेली वेल
तुझ्या देहाभोवती गुंडाळली गेलीय
अन् उगवलीयत त्यावर
हजारो डोळ्यांची फळं

मी अलगद फिरवली
माझ्या डोळ्यांची बोटं
तुझ्या ह्या डोळ्यांच्या पापण्यांवर
अन् माझ्या रात्रीत झाले
तुझ्या डोळ्यांचे असंख्य तारे

◆

## माझ्या अंड्यातून

माझ्या अंड्यातून निघणाऱ्या
हजारो ओंगळ काळ्या वेली
गांडूळांसारख्या पसरतात
माझ्या गोऱ्या देहावर

पाचोळ्यासारखा हळूहळू मी होतोय
त्यांचा आहार

मी लुप्त होणाऱ्या वानर जातीतला
शेवटचा नर

त्यांच्या सावल्यांखालून वाहतंय
माझं रक्त
त्यांच्या सावल्यांखाली जगतंय
माझ्या डोळ्यांचं जांभळं पाणी

एखाद्या दिवशी
ह्या लाखो रात्रवेलींच्या गोळ्यांखाली
सापडेल
फक्त पारदर्शक अंधार

◆

## माझ्या डोळ्यांवरची गोरखचिंच

माझ्या डोळ्यांवरची गोरखचिंच
घट्ट धरून ठेवते माझी बुबुळं
तिच्या मुळांत.

एखाद्‌दिवशी
आणीन काढून
तिच्या भकास निष्पर्ण फांद्यांवर
लोंबकळणारं चंद्राचं मढ.

जागं झाल्यावर
विचारेल मला ते असंख्य प्रश्न
काही प्रश्नांना असतील
कबुतरांचे पंख
तर काहींना गिधाडांचे.

येतील का मला
त्यांची उत्तरं?

की होतील माझ्या डोक्याचे
असंख्य तुकडे?

◆

## माझ्या बुरुजातून उडालेल्या वाघांचे

माझ्या बुरुजातून उडालेल्या वाघांचे
पेटलेले पंख बघा

माझ्या अरण्यातल्या झाडांत
खजुराहोची मिथुन शिल्पं बघा

गिधाडांचे धुळकट पंख पांघरून
निष्पर्ण गोरखचिंचेवर विसावणाऱ्या शब्दांचे डोळे बघा.

पाहा माझे शब्द
वाघांचे पंख पसरून
झाडाझाडांच्या ओल्या नग्न देहांमधून
वाट काढीत झेपावतात तेव्हा

तेव्हा त्यांच्या डोळ्यांत
कशी खेळतात
आकाशाच्या आरशात नाचणारी प्रतिबिंबं
समुद्राच्या आदिम वासनेची

◆

## सांगाडा

पाहत नाही कोणी ढुंकूनही
ह्या जख्खड म्हाताऱ्या
मोटरसायकलीच्या सांगाड्याकडे

पाहा त्याच्या जाड भिंगामागच्या
एकमात्र डोळ्यात पडलंय
दमेकऱ्याच्या थुंकीचं फूल
मध्यरात्रीच्या क्षयग्रस्ताचं खोकणं
डोकावतंय
आज त्याच्या चालण्याच्या आवाजातून.

एकेकाळी
पुरुषांच्या मांड्यांमध्ये राहून
हाच देत होता
पुरुषत्वाच्या मिराशीला जोड
त्याच्या स्नायूत होता
यौवनाचा कडक वेग
अन् ताकद होती गर्विष्ठ पोलादाची.

एक जराशी किकच पुरेशी होती त्याला
पिसाळून हाताबाहेर जायला.

लाजऱ्यात लाजरी नजरही
रोवली जायची त्याच्या पाशवी आकारावर
त्याच्या उच्छृंखल वेगावर.
पण पाहा आज कसा मुकाट्यानं
पडलाय कबाड्याच्या नरकात
आपल्या देहाची दळिद्री वळकटी करून
स्वत:च्या गार गोठलेल्या
लाचारीच्या धूसर विचारांना हुंगीत

◆

## झाड काळ्या जांभईचं

झाड
काळ्या जांभईचं
रोपलं

मी बुबूळांच्या पारदर्शक
सालीवर

खत त्याला
नासलेल्या रात्रीचं घातलं

आता
त्याच्या भकास फांद्या
डोकावतायत
त्वचेच्या प्रत्येक धूळीने भरलेल्या
छिद्रातून

केव्हाही

प्रचंड स्फोटात
करेल
माझ्या देहाच्या चिंध्या

माझ्या जागी असेल

त्या काळ्या राक्षसी
वृक्षाचीच

उपस्थिती

◆

# रिकामं

माझं मन दुपारी

रिकाम्या खोलीच्या रिकाम्या कोपऱ्यात
लोंबकळणाऱ्या रिकाम्या हँगरसारखं रिकामं

खिडकीत एक रिकामं आकाश.

माझ्या मनाच्या रिकाम्या खोलीत
रिकाम्या हँगरवर लोंबकळणारी
रिकामी माणसं

आणि रिकाम्या माणसांच्या रिकाम्या मनातल्या
रिकाम्या खिडकीतलं एक रिकामं आकाश.

रिकाम्या खोक्यातून
खोका वजा केलात तर
जे उरतं ते माझं मन

रिकाम्या डोळ्यातून डोळे वजा केलेत तर
उरतात ते माझे डोळे.

रिकामेपणाचे डोळे रिकामेपणाचं आकाश
रिमामेपणाचं मन
माझे डोळे माझं आकाश माझं मन.

◆

## उन्हाळा : एक मोझॅक

क्रिकेटरांनी मैदानावर उंच टोलवलेला चेंडू
अचानक साळुंकी होऊन उडून जातो

धपापणाऱ्या कुत्र्याच्या लाळेचे होतात
असंख्य हिरे

गाड्यांच्या कुबट नरकात तडफडणारे
घामांध चेहरे

मध्यमवर्गीयांच्या विचारांसारखे
ॲपार्टमेन्टच्या बाल्कनीत वाळत पडलेले कपडे.

घायकुतीला आलेल्या गब्दूल बोक्यासारखा
उन्हाळा सर्वत्र हुंगत फिरतो

पण माझ्या वाळक्या पिंपळपानाच्या जाळीतून
उडतात शुभ्र कबुतरांचे थवे.

◆

## उजेडाच्या तिरडीवर

उजेडाच्या तिरडीवर
मढ्याला किती कष्ट
पण काळोखाच्या आरशात
चेहरा आपला स्पष्ट

उजेडाचा वास आहे
खवट आणि शिळा
काळोखाचा ओलेपणा
पुन्हा एकदा पिळा

पण आकाशात उधळलेत
स्वप्नांचे रंग
पंखाशिवायचं पाखरू
उभं आहे दंग

सूर्याच्या अडकित्त्यात
चंद्राची सुपारी
काळोखाचा फवारा
रणरणत्या दुपारी

◆

## ओलसर असतं

ओलसर असतं

तांबरलेल्या खडकाचं काळीज

तोच ओलेपणा
घेऊन आली

काळी विंचवीण

अन् ठेवून गेली माझ्या पाठीवर

हजारो पांढरी अंडी

◆

## निळ्या फुलदाणीत

निळ्या फुलदाणीत
एकदा रोवला मी

गोरा गोरा हात

हाताला होती
बोटांची पानं सात

वाटलं
निवडुंगालाही फुलं येतात

तर ह्यालाही यायला हवं
एखादं बारकं पिवळं फूल

पण त्यावर उगवलंय
छद्मी चलाख

सूर्यफूल

◆

## मेलेल्या खिडकीतून पाहतो

मेलेल्या खिडकीतून पाहतो
रुग्णालयासारखं पांढरं जग
माझ्या केसाळ बुबुळांनी

मृत्युलोकातल्या फुलांवरची
कुष्ठरोगी फुलपाखरं
ज्यांच्या डोळ्यात पडलीयत फुलं
झगडताना दिसतात स्वत:च्या सावलीशी

पाणीही कराकरा खाजवतं
आपली खरूज झालेली पारदर्शक पाठ
आपल्या गलिच्छ तुटक्या नखांनी

ज्याला आपण मध समजतो
ते निघतं निळं विष
तेच वाहत असतं आपल्या
रिक्त वाहिन्यांतून

◆

## मी करकचून चावली आकाशात उडणारी शेतं

मी करकचून चावली आकाशात उडणारी शेतं
पण हिरड्यांमधून उडून गेले हिरव्या पोपटांचे थवे
मागे उद्ध्वस्त तोंडात सोडून गेले
मरतुकड्या मातीच्या बरगड्यांची चव.

पिरॅमिडची लागवड असलेलं इजिप्तचं वाळवंट
मी गिळायला गेलो
स्फिंक्सच्या डोळ्यांमधलं क्षणभंगूर पाखराचं प्रतिबिंब
पण तोंडाचे झाले ठिसूळ ममीसारखे तुकडे.

मी प्यायला गेलो पाताळातून वाहणारा पाताळयंत्री काळ
पण खेकडीणीसारखं पोट फुटलं काळाचं
अन् हजारो इवलीशी पिल्लं पळाली
माझ्या विझलेल्या समुद्र किनाऱ्यावर

मी चाटायला गेलो जिभेखाली लागलेल्या पोळ्यांचा मध
पण केलं मधमाशांनी त्यांचं रासायनिक लोकनृत्य
माझ्या वांझोट्या प्रेताभोवती दंशाचा सोहळा साजरा करण्यासाठी

थुंकलेल्यावर जशा लूत लागलेल्या माशा भणभणतात
तसे हे बोकाळलेले शब्द जमतात माझ्या अदृश्य चेंगट शेपटावर
गर्रकन वळून मी त्यांच्यावरच झडप घालतो

◆

## माझ्या उघड्या देहावर

माझ्या उघड्या देहावर
फिरणाऱ्या शेकडो जाडजूड
पालींना विचारला मी
त्यांच्या ओंगळ गाण्यांचा अर्थ.

आमचा रंग आहे तुला
तुझा देहच आमचं घरटं
अन् तू ठेवत नाहीस का
तुझ्या तोंडातून जिथंतिथं
आमचीच अंडी?

◆

## मच्छरदाणी महात्म्य

खरं तर हे माणूस पकडण्याचं जाळं
माणसं डासांपासून स्वत:चं कातडं वाचवण्यासाठी
ह्याच्या दिशेनं वाहत वाहत येतात
आणि सापडतात छिद्रान्वेशी आवेशात.

डास बाहेरून हवाई निरीक्षण करतात
अन् पुढाऱ्यांप्रमाणे रक्तापर्यंत पोचण्याचा मार्ग काढतात.
मच्छरदाणीत उताणा पडला असताना
माझ्या तोंडातून हिरवागार बोन्साय वड उगवतो

छिद्रातून येणारा ट्यूबलाइट प्रकाश
अन् सीलींग फॅनचा वारा
तो मुकाट्याने श्वसतो
मी बोन्साय वडाच्या सावलीत झोपतो

अन् माझा सूक्ष्म देह
मच्छरदाणीच्या छिद्रातून
बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो

रात्रीच्या काळोखात
हे जगद्व्यापी जाळं विणणारा
उपद्व्यापी म्यूटन्ट कोळी येतो

पण माझा सूक्ष्म डीजिटल देह
केव्हाच निसटलेला असतो
मच्छरदाणीच्या चाळणीतून चाळला जाऊन

◆

## काही भग्न कवितांचे विखुरलेले अवशेष

१

निष्पर्ण कष्टावक्र बाभळीत
एका गबाळग्रंथी घरट्यात

माझा एक तळहात
उबवतो
पिवळी पडत जाणारी

घामेजलेली सनातन अंडी

२

रात्रीत
रिकाम्या गोरखचिंचेवरून

काढून आणली मी

आजारी पिवळ्या चंद्राची
कडुजार कात

पण तिथंच राहून गेली
माझ्या डोळ्यांची
ओली साल

३

काल संध्याकाळची
हातात हात घालून फिरायला गेलेली
दोन उघडी शेतं

आज कुठे परतून
निष्पर्ण गोरखचिंचेच्या सावलीत

निजलीयत

४

मी मिटल्या तहानलेल्या पापण्या
बोटांवर उगवलेल्या दहा डोळ्यांच्या

आणि व्याकुळ झाले
माझे देहावरचे सहस्त्र डोळे

तुझ्या देहासाठी
वाळवंट झालेत नक्षत्रांसारखे
वाट पाहणारे हजारो डोळे

तुझ्या नास्तित्वाचा मध
झरलाय माझ्या जिभेवरून

फक्त फुंकर मार अन् विझवून टाक

ह्या निरर्थक नक्षत्रांना

◆

# चौऱ्याऐंशी लक्ष भेसूर फांद्या पसरून

चौऱ्याऐंशी लक्ष भेसूर फांद्या पसरून
बसलाय जिवंत काळा पिंपळ
अंगावर रात्रीचा पिसारा
त्याच्या डहाळ्या लगडल्यात
भेदरलेल्या काळजाच्या फळांनी.

माझ्या दिवस रात्रीत कधीही
डोकावतात त्याचे हडळ हात
तो उभा राहतो माझ्या अंगावर
काटा होऊन.
मी नसलेल्या देवाचं नाव घेतो.

त्याच्या खाली प्रेतांचं साम्राज्य
त्याच्या खाली नाचणारी
भुतावळ मी पाहिली आहे
माझ्या डोळ्यांच्या खाचांमधून
मी नसलेल्या देवाचं नाव घेतो.

मीच उपेक्षित खडकाळ माळरानात
बसलोय माझा चौऱ्याऐंशी लक्ष फांद्यांचा पसारा घेऊन
मीच माझ्या रात्रंदिवसाचा हिशोब ठेवतो.
माझ्या हडकाळलेल्या
भयानक बोटांवर

पाहा माझ्यातून सळसळतोय
हादरवून सोडणारा
अदृश्य
वारा

◆

# कागद

कागदाचे रस्ते
कागदाची घरं
कागदाची माणसं
कागदाची वाहनं
कागदाच्या झाडांवर
उगवलीयत पतंगाची फळं

ह्या जगाच्या कागदावर
अगम्य लिपीत
कोण सोडून गेलाय
गिचमीड संदेश

उद्या काळोखात
पडेल कागद पिवळा
वाळवी करेल त्याची चाळण
तेव्हा त्याला साधा हात लावला
त री
तो
मो
डे

◆

## कोणीतरी लावून गेलंय

कोणीतरी लावून गेलंय
दोन मण वजनाचं मोठ्ठ तांबरलेलं कुलूप
माझ्या जिभेला त्यात भोकं भोकं पाडून

माझ्या शब्दांच्या ओठांना, पापण्यांना वाक्यांना
उद्‌गारांच्या डोळ्यांना, फणसाच्या चवीला
माझ्या अंधारलेल्या मौनाला
सगळ्यांनाच घालून गेलंय कोणीतरी
म्हातारी गंजकी कुलूपं

रेल्वे प्लॅटफॉर्मवरचं गोल घड्याळ पिकतं
पिवळं पडतं आणि देठातून तुटून
गळून पडतं पानगळीत
आणि मला दिसतो

चाव्यांचा थवा
आपलं घरटं सोडून उडून जाताना
सूर्याच्या केशरी अंतर्मनात
अंतर्धान पावताना

◆

## जिथे शून्याचं बीज पडलं होतं कधी

जिथे शून्याचं बीज पडलं होतं कधी
उभं आहे तिथं हे घनदाट अदृश्य झाड
एकलतेचं.
                त्यावर डोलतायत
                माझ्या चेहऱ्यांची
                असंख्य फळं.
                मौनाच्या ह्या वृक्षावर पाहा
                कशी समृद्ध आहेत
                अछंदाची पानं.
तुम्ही म्हणाल
                उभं कसं आहे हे अजूनही ?
हे बेवारशी ढग
पांढरे वांझ
शिंपडतात त्यावर अधूनमधून
आभासी पाणी.

अन् भूगर्भात घुसमटलेली
अथांग दुःखं
पुरवतात की त्याला
आवश्यक क्षार.

◆

# आजारावर आणखीन एक कविता

रात्री अर्धवट झोपेत
भूकंपाचे हादरे
मग दिवस हाताबाहेर जातो.

जग मस्तपैकी
घड्याळांच्या काट्यांप्रमाणे चालत राहात.

आपण सुन्न होऊन
जगाच्या किनाऱ्यावर
मासे पकडत बसतो.

बरं असतं
कधीमधी लोकांच्या दयेमायेवर जगणं
अन् संपूर्णपणे निरुपयोगी होऊन पडणं.

जी लोकं कधीही आजारीबिजारी
पडत नाहीत त्यांची ईर्षा करणंही
काही खरं नाही
म्हणूनच
वरवरच का असेनात
पुस्तकं चाळायची
इतर गमतीदार विचार करायची.

तोंडातल्या कडवट चवीसारखा
दिवस दरवळत राहतो.
दुपार
अंगासारखीच दुखत राहते

आपण संध्याकाळची वाट पाहात
पडून राहतो.

◆

## झोपलेल्या शेताच्या थंड ओलसर हिरव्या पापण्या

झोपलेल्या शेताच्या थंड ओलसर हिरव्या पापण्या.

लखलखीत तपकिरी बुबुळांवर सांडलेल्या वेली.

रंग उडालेल्या रक्तावरची शेवाळं.

समुद्राचा काळवंडलेला हिरवट गर.

कुमारिकेच्या कच्च्या सफरचंदी स्तनांना
अन् तिच्या हिरव्या कौमार्यपटलाला शोधणारे
कित्येक कच्च्या केळ्यांचे घड

ट्रॅक्टरच्या मागे भरलेले

कच्च्या हिरवट सूर्याचा कच्चा हिरवा प्रकाश
शहाळ्यांवर पडतो.

मी.
माझ्या मनाच्या निष्पर्ण फांद्यांकडे
टक लावून

पाहत बसतो.

◆

## भिंतीशिवायच्या खिडकीपाशी

भिंतीशिवायच्या खिडकीपाशी
बघतोय वाट तुझी

वाटतं
सहजच येशील
मागच्या दारातून

माझ्या भिंतीशिवायच्या घरात.

भाषेशिवायचा शब्द होऊन
थांबलोय
उद्‌गाराच्या कडेवर
समोर पारदर्शक दरीचे

निरुत्तर बाहुपाश

खिडकीशिवायच्या भिंतीतूनही दिसतात
पानगळीचे मातकट पंख

दारांशिवायच्या भिंतीतूनही दिसते
धुक्यात हरवलेली निर्जन वाट

भिंतीशिवायच्या खिडकीशी
थांबलोय होऊन

निव्वळ नि:श्वास.

◆

## अगम्य कारणामुळे

अगम्य कारणामुळे
माझ्या तळहातावर
भोपळ्याएवढी गाठ झाली
डॉक्टरीणबाईंनी हातानेच ती फोडली
व त्याच्या खळगीतून
थोडासा पू बाहेर काढला

अगम्य कारणामुळे
संपूर्ण उघडलेल्या नळाप्रमाणे
त्या मुलीतून
ऋतुस्त्राव फळाफळा वाहून
व ती वाळत वाळत अदृश्य झाली

अगम्य कारणामुळे
माझ्या घराच्या पायाला धरल्या तांबड्या मुंग्या
व जमिनीत पुरलेली
कुजकी प्रेतं फरशी फोडून बाहेर पडली

अगम्य कारणामुळे
मला दिवस गेले
लिंगाच्या जागी फट झाली
व माझा गर्भ पडून गेला
रात्रीच्या काळोखात

अगम्य कारणामुळे
शब्दांच्या काळ्या निळ्या प्रेतांना
मी एकमेकांत ओवतो
अन रचतो स्वत:चं स्मशानगीत

◆

## बुबुळांशिवायची डोळस कविता

बुबुळांशिवायची डोळस कविता
कावळे विद्युत तारेवर ऑनलाइन
जाणिवांच्या विष्ठेशी एकनिष्ट
रेल्वेवरच्या मेलेल्या घुशी, कचऱ्याच्या पेट्या, घाण
दुर्गंधी मेलेल्या कुत्र्याच्या फाटक्या पोटातून निघालेल्या
गुलाबी आतड्यांची मेजवानी करणारी माझी जवान प्रेयसी
गोऱ्यावर काळ्या शब्दांच्या रंगाची
राहतीय कित्येक वर्षांपासून
बांधून गबाळी घरटी माझ्या डोळ्यांच्या खाचांमधे
तुम्हाला रोज जरी दिसली तरीही तुम्ही
नाहीच दिसली असं म्हणत असता.
ती ऐकू येते तुम्हाला
काळ्या दुर्वासिनींच्या भिशीच्या वार्षिक ड्रॉमधे
अभावगीत आळवताना.
कशीही का असेना एकटी सदोदित बाहेरची
पण ती माझी आहे माझ्या मनाच्या वनात राहून
पिते ना ती
आकाशाच्या मनातलं पाणी
माझी पातक पक्षिणी

◆

## राखोडी पारवे उडाले

राखोडी पारवे उडाले
अस्थिपिंजऱ्यातून
क्षितिजाच्या पिंजऱ्यातून
क्षणभरापुरतेच तेव्हा
ॲपार्टमेन्टस्‌च्या ठोकळेबाज चेहऱ्यावरचा उजेड

बॅबिलॉनच्या ह्या मनोऱ्यावरचा प्रकाश
मोटारी वाहन वाहतूक वर्दळीच्या
अभावुक चेहऱ्यावर खेळणारी
सकाळ दुपार संध्याकाळ

क्षणभरापुरताच आपल्या हातात
जगात कोणतीच गोष्ट इतकी आपली झालेली नसते

जेव्हा आपणच उडून जाऊ
राखोडी पारवे होऊन ह्या अस्वस्थीपिंजरातून
आणि नाहिसे होऊ मखमली नास्तित्वात

तेव्हा तरी होईल का
काहीतरी आपलं

खऱ्या अर्थानं?

◆

## कवितेच्या डझनभर व्याख्या

कविता म्हणजे बुबुळांवर उगवलेलं गवत
कानाच्या गुहेत उलटे लोंबकळणारे संन्यासी
नाकाच्या भिंतींवर कोरलेले प्रेम संदेश
जीभेवर उगवलेली काळी तुळस

कविता म्हणजे घशात अडकलेल्या विचारांचा काटा
अंधमूकबधीर हृदयाच्या मनातला गोंधळ
आतड्यांत अडकलेले हिरे
गारठलेल्या जठरात जमलेला बर्फ

कविता म्हणजे कोमेजलेल्या मलूल लिंगाचं तत्त्वचिंतन
मांडीच्या हाडांच्या पोकळीत लपवलेली हस्तप्रत
पायाचा अंगठा अन् पहिल्या बोटांमधून वाहत येणाऱ्या नद्या
कविता म्हणजे पुरुषांना उशीरा उगवणारं शेपूट
ज्याच्या वेटोळ्यावर चढून बसतो तो
राक्षसांच्या दरबारात

◆

## टाके तोडतो

टाके तोडतो मी
भाषेच्या घाणेरड्या जखमांचे
आणि उघडतात त्यांची
कच्ची दुर्गंधी तोंडं.

भाषेच्या अश्रूत गुहेतून जन्मते
माझी तीन डोक्यांची राक्षसी कविता.
भिंतीवर नाचणाऱ्या
तिच्या आरोळ्यांच्या सावल्या
म्हणजे तिचे अर्थ.

अंगावर शहारे येतात
ऐकून तिचे लोखंडी श्वास.
तिच्या फुटक्या डोळ्यांत जी आहेत
ती सडणाऱ्या समुद्राची स्वप्नं.

ती खाते तुमच्या निरागस भावगीतांची पिल्लं.

कर्करोगासारखी ती येऊन निजते
तुमच्या कुशीत.
ती संपवते तुमच्या केसाळ स्तनातून
रक्ताचा शेवटचा थेंब.
ती गाते तिच्या प्रत्येक विद्रूप तोंडाने
असत्य अशिव आणि असुंदराच्या भयाण ऋचा.

पेरून पाहता का ह्या अर्भकाला
तुमच्या नीटनेटक्या बागेत?

◆

# माझे सुजलेले काळेनिळे शब्द

म्हाताऱ्या योनीवर बसलेली
नरकीय फुलपाखरं
वाळक्या ढोलीतून उडाले बेचिराख
शुभ्र बगळे
दु:खाच्या पाण्यावर
अगम्य गिचमीड हस्ताक्षरं
कवितेच्या जहाल विषवेली
शब्दांचे ओंगळ मळे.

विंचू जन्मतात दगडांच्या गर्भातून
अन् बोटात मेलेल्या फुलपाखरांचे पंख
तरीही निसटतात शब्द आपल्या हातातून
अन् रेशमी कोशातून जन्मतात
वैराण डंख.

ह्या मोहक कुरूप गावात राहायचं
जगाच्या थकलेल्या जळमटीत गुंतलेल्या शब्दांशी
अन् शब्दात गुंतलेल्या देहाशी खेळायचं
भस्माला, भकास मातीला अन् उद्ध्वस्त जास्वंदीला रोज पाहायचं
अन् सृजनाच्या आगीत स्वत:ला जाळायचं.
पण श्वासाइतकीच गरज
मला सुजलेल्या काळ्यानिळ्या शब्दांची आहे
(पाहिलंत तर श्वासांचीही काय मोठी गरज आहे?)
पाहा, कोवळी कविता कशी
माझ्या नाडीत ठुसठुसतीय
नानेटीच्या चुंबनाहूनही गोड
तिचे डोळे आहेत.

◆

## मिनरल वॉटरच्या बाटलीत

मिनरल वॉटरच्या बाटलीतला
मी एक बंदिस्त बटूवामन
निळ्या झाकणामुळे माझा श्वास
बंद खोलीत अडकलेल्या चिमणीप्रमाणे
सैरावैरा भिरभिरतो

कधी कधी प्लास्टिकच्या पारदर्शक भिंतीवर
एक हात ठेवून मी उभा असतो आणि तुम्ही
तुमच्या कुतूहलाच्या अस्पष्ट गुलाबी चेहऱ्याने
व्यापून टाकता माझं जग.

तुमच्या-माझ्यामधे आहे
बिसलेरी भिंत
कारण माझ्या जगावर भल्या मोठ्या अक्षरात
मला 'बिसलेरी' असं उलटं लिहिलेलं दिसतं
कमरेपर्यंतच्या कोमट उष्ट्या पाण्यात उभा राहून
मी करतो खोटेपणाची आराधना.

पण कधी कधी असंही वाटतं की
आपण सगळेच आपआपल्या बाटलीतून जगाकडे पाहात असतो
कारण वातानुकूलीत जगाच्या खिडकीतून
लोक आदिवासी मजुरांना रणरणत्या उन्हात
राबताना पाहतात
त्याच पद्धतीनं लोक माझ्याकडे पाहतात.
खरं तर मी कोणी बाटलीतला जिन नव्हे
की जिन्नस नव्हे
मी कोणा एका ऋषीच्या शापामुळे
प्लास्टीकच्या पारदर्शक गर्भाशयात

टेस्ट ट्यूब बेबी होऊन जन्म घालवतोय
मला ठाऊक आहे की मी मेल्यानंतरही
माझं भूत याच बाटलीत
पिंजऱ्यातल्या अदृश्य पाखरासारखं जगेल

◆

# एक चुलकोंबडं घर

एक चुलकोंबडं घर
आळशी सदोदित चार भिंतीत राहणारं
चुलपोतरं करत बसणाऱ्या ह्या घराला
घारीचे पंख नाहीत
ते अत्यंत पाळीव आहे
रात्रपाळी करून ढगळ पॅन्ट घातलेला करडा ढग
गळून घरी आला की
लाडानं शेपूट हलवत ते
त्याच्या मांडीवर टुण करून
पोमेरीयन उडी मारून बसतं
ते बूर्झ्वा कुत्र्यासारखं भिकाऱ्यांवर भुंकत नाही की
कम्युनिस्ट कुत्र्यासारखं साहेबावर भुंकत नाही
ते आपलं भुंकतच नाही कोणावर
ते आपलं
घरोबा करून राहणाऱ्या काळोखालाच
चाटत बसतं.

मला ह्या घराची पाळंमूळं खणून
पाहायची आहेत
मला शंका आहे की त्याचा पाया
प्रेतांच्या ढिगावर आहे
कारण प्रत्येक भिंतीवर लाल मुंग्यांच्या
रांगाच रांगा कवायत करताना आढळतात.
मला एक बागडणारं सूर्याचं पिल्लू
पेरायचंय ह्याच्या वाळवीनं पोखरलेल्या
उद्‌ध्वस्त मुळात

म्हणजे उद्या सूर्याचं दैदीप्यमान बीज
धारण करेल हे घर आपल्या गर्भात.

◆

## पुनर्जन्माच्या वेळेचा मंत्रपाठ

भयानक काळा अखंडग्रास वड
मला कापायचाय
त्याला गूढ लेसर करवतीनं
कारण त्याच्या हादरवणाऱ्या सायनाइड पारंब्या
खोल उतरल्यात
माझ्या एकएक क्षणाच्या मुमुक्षू मातीत.
आणि तिथल्या मोकळ्या जमिनीत पेरायचेयत मला
सूर्याचे स्खलित शुक्राणू
व चिकन खाणाऱ्या चंद्राचे रेडियोॲक्टीव्ह अंडं
तिथे करायचीय मला
आशयहीन
पण हिरण्य गर्भाशय असलेल्या अकवितेची शेती

तिथे उगवतील रसाळ तांबडी फळं
वटवाघुळाच्या सूर्यात फणा होण्याच्या तीव्र आतुरतेची
देहाची चव व रक्ताची झिंग घेण्यासाठीच्या युकॅरिस्ट वासनेची
फुफ्फुसाच्या कुजक्या दमट लाकडावर उगवलेल्या
काळाच्या शुभ्र अळंब्यांना
उपटण्याच्या इच्छेची
आणि ह्या रानातून पांढऱ्या बगळ्यांचा थवा होऊन
उडून जाण्याच्या शुभ्र स्वप्नांची.

मला करायचाय माझ्याच देहात
परकाया प्रवेश.
मला जगाच्या देहावरच्या प्रत्येक क्षणावर
व देहाच्या प्रत्येक, जगावरच्या प्रत्येक क्षणावर
काढायचीयत अगम्य सुलटी स्वस्तिकं.
मला ठार मारायचंय

लुप्त झालेल्या नद्यांच्या पारदर्शक पाठींवर
आरूढ झालेल्या म्हाताऱ्या माहुताला
कारण लंगोटीतला कृश अंकुश रोवून
लुप्त झालेल्या नद्यांच्या निळ्या सहस्त्रहारात
तो विझवत असतो
लुप्त झालेल्या नद्यांचे गुप्त डोळे.

मला पुसायचंय
चिनी लिपीत कोरलेलं
माझ्या योरीक कवटीवरचं
स्मशानरात्रीचं अनात्मचरित्र.

ठरवलंय की मला मुळीच व्हायचं नाहीए
मुंडक्याशिवायचा अघोरी
रात्रीत काळ्या वेशात एक सुंदर निरुपयोगी
त्रिशूळ हातात घेऊन फिरणारा
ज्याच्या हातातल्या स्वत:च्याच कवटीवर असते
न सुटलेल्या प्रश्नांची यादी.

आणि मला मुळीच व्हायचं नाहीए
नागड्या शेताच्या प्रेताजवळ
गिधाळणारा अघोरी गोरखचिंच
ज्याची चाहूल लागताच
कान टवकारून धपापत उठून बसतं
गुलाबी जीभ बाहेर काढून
लाळ घोटीत बसणारं शेताचं मढं.

म्हणूनच करायचीय मला
बुभुक्षू साधना
पृथ्वीच्या गर्भात असलेल्या
अगोचर सूर्याची

व सूर्याच्या गर्भात असलेल्या
अगोचर पृथ्वीची.
माझ्या श्वासांच्या लेसरदाहिनीत
दैवाच्या मढ्यावर अग्निसंस्कार करून
उपाशी ब्रह्मांडाच्या
जागृत देवाची उपासना करायचीय
अन् उडून जायचंय होऊन
सोनेरी सुवासिक फुलपाखरांचा थवा
रेशिमवाऱ्याची झुळूक येईल तेव्हा

◆

## काय सांगता येतंय

चंद्रावर कुठंतरी अंधारलेली गुहा
गुहेत गोठलेलं पाणी
पाण्यात
अश्मिभूत माझे डोळे.
उद्या
एखादा सूर्यबीर्य
कुठल्यातरी
क्षितिजावर
निघेलही
पाणी वितळेलही
आणि
माझे गोठलेले डोळे
पांढरी फुलपाखरं होऊन
उडूनही जातील
रात्रीच्या काळ्यानिळ्या शाईत
काय सांगता येतंय?

◆

## अळुवडी अध्यात्म

कांद्याचा दृष्टान्त
आता प्रागैतिहासिक झालाय

आता ही समोरच्या ताटलीतली अळुवडीच घ्या
केंद्राच्या दिशेने वळत जाणारे
चक्राकार घट्ट पदर
तुम्ही उलगडत गेलात
तर काय हाती लागतं आपल्या?
अळुवडीच्या चक्रव्यूहात एकदा जर आपण सापडलो
तर बाहेरच निघता येणार नाही
हे एक गूढ बौद्ध यंत्र आहे
एका अनामिक नेपाळी तंत्रिकाचं

म्हणे तिच्या घट्ट मिटलेल्या पदरांच्या ओठांमागे असतं
चिद्वानंदीचक्र
आपल्या चिभेच्या स्पर्शांनी उमलणारं
अगोचर तांबडं कमळ

काळसर हिरव्या तांबरलेल्या अळुवडीचा
तळकट अनात्मा
तिच्या नाभिकाच्या
नास्तित्वात घर करून राहतो
आपण त्याच्यापर्यंत पोचूच शकत नाही
आपल्या लाळीत
तिची करपलेली तेलकट चव पसरते
तिचा खमंग देह

आपल्या जठराग्नीत विलीन होतो
परंतु अळुवडीचं सत्य काही
आपल्या हाती लागतच नाही.

◆

## ब्लॅक अँड व्हाइट टीव्हीला उद्देशून एक भावगीत

वार्धक्यामुळे तुझ्या डोळ्यासमोर काळोखी येते
म्हणूनच सगळ्यांनी तुला टाकलाय कोपऱ्यात
भिंतीकडे तोंड फिरवून
रंगीत जगाकडे
तुझी काळी कुबडी पाठ करून
काळाच्या कबाडी खान्यात

कित्येक लोकांनी तुझ्या
निर्जीव पिक्चर-ट्यूबमधून
प्राणसंचाराचा प्रयोग केला
पण लुकलुकले फक्त
तुझे खोल अंधारलेल्या खाचांमधले
किलकिले डोळे
अन् नाहीसे झाले

तू आता फक्त ब्लॅक टीव्ही आहेस
शेवटच्या काळोखाची वाट पाहणारा.

पण काळजी करू नको आजोबा
मी तुझ्या बाजूला बसलोय
सेलेरॉन एकशे तेहतीस संगणकासारखा
मनाच्या मात्र पंचाण्णव खिडक्या उघडून
तुझ्याजवळ
तुझ्या अगोदर येणाऱ्या
कालबाह्य विस्मृतीची
वाट पाहात बसलोय

◆



सचिनच्या कवितेत चकित करणारं बरंच काही आहे. स्व आणि भाषेच्या सृजनशील शक्यतांचा वेध घेणारी ही कविता, काव्यात्मकतेच्या रुढ आणि प्रचलित व्याख्यांना छेद देत, अकाव्यात्मक सामग्रीला विलक्षण कल्पकतेनं मांडते. म्हणूनच ती कवितेच्या समधोपट व ठोकळेबोज भाषेला मोडकळीत काढते आणि कुरुप, ओंगळ व भन्नाट समजल्या जाणाऱ्या गोष्टींनाही ती स्वत:च्या कक्षेत सामावून घेते. ह्या कवितेकडे निव्वळ अभिव्यक्ती म्हणून पाहता येत नाही तर तिच्याकडे स्वत:ची विलक्षण वेधक सृष्टी निर्माण करणारी कविता म्हणूनही पाहावे लागेल. ह्या संग्रहातल्या कविता परिचित जगाच्या पलीकडच्या जगावर आणि कोलाहलावर उघडणाऱ्या खिडक्या आहेत. ह्या खिडक्यांतून डोकावताना जे काही दिसतं ते अस्वस्थ करणारं आहे.

अभिधा नंतर
प्रकाशन

मुखपृष्ठावरील चित्र : सजीव खांडेकर